रायगड, रविवार, दि. २७ ऑक्टोबर २०२४

कृषीवल

किंमत ४ ₹

'आप' निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील निवडणूक रणधुमाळीतून आम आदमी पक्षाने माघार घेतली आहे. आम आदमी पार्टी महाराष्ट्रात उमेदवार उभे करणार नाही, अशी माहिती पक्षाचे नेते आणि खासदार संजय सिंग यांनी दिली. परंतु, पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल महाविकास आघाडीच्या प्रचाराला येणार असल्याचे त्यांनी सांगितले. नुकत्याच झालेल्या हरियाणा आणि जम्मू-काश्मीर विधानसभेच्या निवडणुकीत 'आप'ला खातेही उघडता आले नव्हते. त्या पार्श्वभूमीवर 'आप'ने महाराष्ट्र विधनसभेच्या निवडणूक रिंगणातून माघार घेतल्याचे बोलले जात आहे. परंतु, 'आप'चा पाठिंबा महाविकास आघाडीला असणार आहे.

आज चित्रलेखा पाटील यांचा प्रचार दौरा

अलिबाग : शेतकरी कामगार पक्षाच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांची उमेदवारी जाहीर झाल्यापासून त्यांनी प्रचार दौरा सुरु केला आहे. रविवारी कुर्डूससह पोयनाड परिसरात त्यांचा दौरा असणार असल्याची माहिती कार्यकर्त्यांनी दिली. अलिबाग, मुरूड, रोहा विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चित्रलेखा पाटील यांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. दोन दिवसांपूर्वीच पेझारी येथे नारळ वाढवून प्रचाराला सुरुवात केली. रविवारी सकाळपासून संध्याकाळपर्यंत कुर्डूसपासून पोयनाड भागात प्रचार दौरा होणार आहे. सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास कुर्डूस ग्रामपंचायत मतदारसंघात जाऊन प्रचाराला प्रारंभ करण्यात येणार आहे. त्यानंतर चिखली, कुसुंबळे, श्रीगाव व पोयनाडमध्ये प्रचार दौरा असणार आहे.

पुन्हा एकदा आश्वासनं

। अलिबाग । प्रतिनिधी ।

गेल्या पाच वर्षात विकासाच्या केवळ बाता मारण्याचेच काम आ. दळवींनी केले आहे. परंतु, एकही काम त्यांनी पूर्ण केलेले नाही, असा अलिबाग-मुरुड-रोहा मतदारसंघातील जनतेचा आरोप आहे. आमदार झाल्यावर पहिल्यांदा या मतदारसंघातील सर्व रस्ते चकाचक करेन, असे आश्वासन देत आ. दळवी पहिल्यांदा आमदार झाले. परंतु, त्यानंतर त्या आश्वासनांचा त्यांना विसर पडला असून, अद्याप रस्ते जैसे थेच आहेत. दरम्यान, शुक्रवारी झालेल्या गोंधळपाडा येथील प्रचार सभेत आ. दळवींनी गेल्या तीन वर्षांत अनेक रस्ते व अन्य विकासकामे केल्याचा दावा केला आहे. तसेच पुन्हा एकदा तीच आश्वासने देऊन मतदारांना भुलवण्याचा प्रयत्नदेखील केला आहे. परंतु, मतदारसंघातील रस्त्यांची अवस्था आजही अत्यंत बिकट आहे. साधे रस्ते दुरुस्त करता आलेले नसताना मतदारांना कोस्टल रोडचे स्वप्न दाखविण्याचे काम आ. दळवींनी गोंधळपाडा येथील सभेत केले आहे.

- **आ. दळवींकडून मतदारांना विकासकामांचे आमिष**
- **रस्त्यांचे आश्वासन पूर्ण करण्यास अपयशी ठरल्याने नाराजी व्यक्त**

अलिबाग-रोहा रस्त्यावरुन प्रवास करताना प्रवाशांना प्रचंड त्रास होत आहे. धुळीमुळे आरोग्यही धोक्यात येण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. पंतप्रधान व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या कामांचे भूमीपूजन होऊन वर्ष होत आले तरीदेखील त्याचेही काम सुरु केले नाही. रस्त्यांचे आश्वासन पूर्ण करण्यास दळवी अपयशी ठरल्याची चर्चा जोरात सुरू आहे. त्यामुळे दळवींबाबत मतदारांमध्ये नाराजीचे सूर उमटत आहे. या निवडणुकीत मतदारांच्या रोषाचा फटका बसणार असून, त्यांना मतदारच पराभवाची धूळ चारणार असल्याचे चित्र आहे.

अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्यांचे भांडवल करीत महेंद्र दळवी यांनी मागील निवडणुकीत मते मिळविली होती. स्वखर्चाने रस्त्याचे काम करीन, असे आश्वासनही दळवींनी दिले होते. सध्या त्याबाबतचा व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. मतदारांनी चांगल्यारस्त्यासाठीविश्वासाने दळवींना मते दिली होती. मात्र, दळवींनी मतदारांची घोर निराशा केली आहे. खड्डेमय रस्त्यामुळे प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

प्रधानमंत्री ग्रामसडक, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील अनेक गावांमधील रस्त्यांच्या कामांचे भूमीपूजन दळवी यांच्या हस्ते करण्यात आले आहे. परंतु, आजही अनेक गावांतील रस्त्यांच्या कामांना सुरुवात झालेली नाही, अशी प्रतिक्रिया अनेक गावांतील नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. दळवींच्या या भूमिकेबाबत अलिबाग विधानसभा मतदारसंघातील मतदारांमध्ये नाराजीचे सूर उमटत आहेत.

रस्त्यांच्या कामांबाबत दळवींना दिलेले आश्वासन पूर्ण न केल्याने तीव्र संताप निर्माण झाला आहे. महेंद्र दळवी पुन्हा आमदार नको, अशा प्रतिक्रिया उमटत आहेत. परिणामी, विधानसभा निवडणुकीत दळवींना फटका बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यात महायुतीमधील भाजपचे काही कार्यकर्ते दळवींच्याविरोधात असल्याचे चित्र आहे. त्याचाही परिणाम दळवींना भोगावा लागणार असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

... पण दळवी नको!

मागील पाच वर्षांत आमदार महेंद्र दळवी यांनी विकासाची आश्वासने दिली. प्रत्यक्षात मात्र अनेक कामे अजूनही त्याच अवस्थेत आहेत. विकासकामे करण्यास दळवी अपयशी ठरले आहेत. त्यामुळे महेंद्र दळवी पुन्हा आमदार नको, अशी संतप्त प्रतिक्रिया जनतेतून व्यक्त होत आहे.

भाजप राबविणार 'उरण पॅटर्न'

महायुतीच्या भाजपसह शिंदे गटाची अलिबागमधील होरीजन येथील सभागृहात बैठक झाली. या बैठकीत भाजपचे ज्येष्ठ नेते सतीश धारप यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत गोड बोलून शिंदे गटाची कानउघाडणी केली. दळवींच्या मनमानी कारभाराबाबत भाजपच्या काही कार्यकर्त्यांमध्ये आजही नाराजी आहे. अशातच अलिबाग विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर मंगळवारी २९ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज भरणार आहेत. त्यांच्या पाठीशी भाजपचे ८५ टक्के कार्यकर्ते असल्याचे बोलले जात आहे. यावरुन शिंदे गटातील दळवींना पाडण्यासाठी भाजप अलिबागमध्ये उरण पॅटर्न राबविणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

'रिलायन्स'ची भिंत स्थानिकांच्या मुळावर

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागोठणे कंपनीच्या संलग्न बेणसे झोतिरपाडा ग्रामपंचायत हद्दीत नवीन प्रकल्पाची उभारणी होत आहे. मात्र, हा प्रकल्प उभारत असताना स्थानिक, भूमीपुत्र, प्रकल्पग्रस्त, शेतकरी, पशुपालक, मत्स्य व्यावसायिक यांच्या मागण्यांची आणि तक्रारींची रिलायन्स व्यवस्थापनाकडून लेखी स्वरूपात दखल व पूर्तता होणार असल्याची कोणतीही विश्वासार्ह हमी आजवर दिली गेलेली नाही. अशातच ऐन निवडणुकीत पोलीस बळाच्या वापराने रिलायन्सने बेणसे सिद्धार्थनगर (बौद्धवाडी) गावालगत ३० फुटांची आवाढव्य भिंत बांधण्याचे काम सुरू केले आहे.

•> पान २ वर

पोलीस बळाचा वापर करुन काम सुरू

ग्रामस्थ, शेतकरी आंदोलनाच्या पवित्र्यात

वहिवाटीचे रस्ते, गुरचरण नामशेष होण्याची भीती

कंपनीच्या जागेमध्ये संरक्षक भिंत बांधण्याचे काम सुरु आहे. कंपनीच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून हे बांधकाम करण्यात आले असल्याची माहिती कंपनी प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

तब्बल आठ कोटींची चांदी जप्त

रसायनी : विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू असताना जागोजागी पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवला आहे. प्रत्येक वाहनाची तपासणी करण्यात येत आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून नाकाबंदी करण्यात येत असताना खालापूर टोलनाक्यावर एमएच ०१. ईएम ८७७५ क्रमांकाचा पिकअप टेम्पो खालापूर •> पान २ वर

निवडणुकीत पोलीस दुर्लक्षित

महसूल प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याची खंत

। अलिबाग । प्रतिनिधी ।

विधानसभा निवडणुकीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी रायगड पोलीस रात्रीचा दिवस करीत आहेत. उन्हात उभे राहून बंदोबस्त करीत आहेत. मात्र, ऐन निवडणुकीत पोलीसच दुर्लक्षित असल्याचा आरोप पोलीस कर्मचाऱ्यांनी केला आहे. उन्हात उभे राहून काम करीत असतानादेखील त्यांना पाणी व इतर सुविधा देण्यास अलिबागमधील महसूल यंत्रणा अपयशी ठरत असल्याची खंत पोलीस कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे. याकडे जिल्हाधिकारी गांभीर्याने लक्ष देतील का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

रायगड •> पान २ वर

पंधरा वर्षीय मुलीवर अत्याचार

। पनवेल । वार्ताहर ।

पंधरा वर्षीय मुलीसोबत शारीरिक संबंध ठेवून ती गर्भवती राहिल्याप्रकरणी दोघांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. पीडित मुलगी पनवेल तालुक्यातील राहणारी असून, मार्च २०२२ मध्ये आरोपी करण याने तिच्याशी ओळख केली आणि जंगलात भेटायला बोलावून जबरदस्तीने व मारण्याची धमकी देऊन तिच्यावर बलात्कार केला. तसेच मे आणि जून २०२४ दरम्यान आरोपी दिवेश कातकरी याने या मुलीसोबत लग्न करण्याची हमी देऊन ती अल्पवयीन असल्याचे माहीत असतानादेखील जंगलात नेऊन तिच्यावर बलात्कार केला. पीडित मुलगी गर्भवती राहिल्यानंतर हा सर्व प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी पोलिसांनी दिवेश कातकरी याला अटक केली. दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे.

पोलीस महिलेची आत्महत्या

। पनवेल । वार्ताहर ।

पोलीस महिला (पत्नी) च्या आत्महत्येप्रकरणी पतीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी आरोपी पती आकाश शिवाजी गोडसे (रा. पळस्पे मॅरेथॉन, नेकझॉन) याला अटक केली.

स्नेहा उर्फ सुजाता खोत या २०१८ मध्ये महाराष्ट्र पोलीस दलात नवी मुंबई पोलीस मुख्यालय येथे नेमणुकीस होत्या. त्यांचे लग्न फेब्रुवारी २०२२ मध्ये आकाश गोडसे यांच्यासोबत झाले. आकाश गोडसे हे नोकरी करत असलेल्या कंपनीतील एका मुलीसोबत त्यांचे अनैतिक संबंध असल्याने स्नेहा आणि पती आकाश यांच्यात एक वर्षापासून वादविवाद होऊन भांडणे होत होती. दरम्यान, घराच्या बेडरूममध्ये पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन त्यांनी आत्महत्या केली. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी आरोपी आकाश गोडसे याला अटक केली.

बैलाची चोरी करुन कत्तल

अंधाराचा फायदा घेत आरोपी फरार

। पेण । प्रतिनिधी ।

पेण येथील शेतकऱ्याच्या बैलाची चोरी करुन निर्जन स्थळी त्याची कत्तल करण्यात आली आहे. दरम्यान, संबंधित आरोपींनी सदर बैलाचे मांस एका गाडीत भरुन घटनास्थळावरुन पोबारा केल्याची घटना घडली आहे. याबाबत आरोपींविरोधात पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पेण पोलीस ठाण्यातून माहिती घेतली असता प्रकाश रामचंद्र शिंगरूत, रा. जुने आरटीओ ऑफिसच्या समोर स्वत:चा शिंगरूत वाडा नावाचा तबेला असून, त्यामध्ये दुभती जनावरे आहेत. याच जनावरांमध्ये राजा नावाचा एक बैल होता. तो २४ ऑक्टोबरला तबेलाच्या शेजारी असलेल्या गुरचारणातून गायब झाला. सगळीकडे शोधला तरी शोध लागला नाही. मात्र, दि. २५ ऑक्टोबर रोजी दुपारी २:३० च्या सुमारास नंदन भोईर नामक व्यक्तीने प्रकाश शिंगरूत यांना फोन लावला आणि सांगितले की, विश्वेश्वर स्मशानभूमीच्या समोर कोणत्या तरी जातीच्या जनावराचे कुजलेले थोडे मांस दिसत आहेत. हे समजल्यावर प्रकाश शिंगरूत खात्री करण्यासाठी घटनास्थळी पोहोचले आणि त्यांना आपल्याच बैलाचे अवशेष असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी याबाबतची तक्रार पेण पोलीस ठाण्यात नोंदविली. साधारणतः बैल हा जर्सी जातीचा काळा पांढरा रंगाचा आखूड शिंगांचा ५० हजार रुपये किमतीचा होता. •> पान २ वर

रोह्यातून गांजा विक्रेता गजाआड

चणेरा : रोहा शहरातील खालचा मोहल्ला मुस्लिम कब्रस्तानजवळ जामा मशीद रोडवर अरबाज अहमद बडे (२४) रा. खालचा मोहल्ला हा गांजा विकत असल्याची माहिती रोहा पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांना मिळाली होती. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक ए.आर. रावडे, पोलीस हवालदार म्हात्रे, अनिल पाटील यांनी सापळा रचून गांजा विकणाऱ्या अरबाज अहमद बडे या आरोपीच्या रोहा पोलिसांनी मुसक्या आवळल्या.

शेतजमिनी बळकावण्याचा घाट

नोंदविलेल्या सूचना व हरकतींवर सुनावणी न घेता होणाऱ्या भूसंपादनास शेतकऱ्यांचा विरोध

। चिरनेर । प्रतिनिधी ।

सरकारने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ला तिसऱ्या मुंबई विकसित करण्यासाठी नवनगर विकास प्राधिकरण (एनटीडीए) म्हणून नियुक्ती केल्याची अधिसूचना जाहीर केला आहे. यासाठी उरण तालुक्यातील २९, पनवेलमधील ७ तर पेणमधील ८८ आशा एकूण १२४ गावांतील ३३२ चौरस किलोमीटर क्षेत्रावर हे नवे शहर उभारण्यात येणार आहे. या शहराला मुंबईतील बीकेसीच्या धर्तीवर कर्नाळा-साई-चिरनेर (केएससी) संकुल या नावाने ओळखले जाणार आहे. यासाठी येथील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांना विश्वासात न घेता शासनाने निर्णय घेतल्याने विरोध करण्यास सुरुवात केली आहे.

मार्च महिन्यात कोकण भवन येथील कोकण नगररचना विभागाकडे शेतकऱ्यांनी २५ हजार हरकती व सूचना नोंदविल्या होत्या. मात्र, या संदर्भात शासनाने कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याच्या आदल्या दिवशी एमएमआरडीएची नवं नगर प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संताप आहे. १९७० मध्ये नवी मुंबईच्या उभारणीसाठी १८ गावे त्यानंतर लॉजिस्टिक पार्कसाठी दहा व रिजनल पार्कसाठी ७ गावांतील जमिनी प्रकल्पासाठी संपादित झाल्या आहेत व प्रक्रिया सुरू असून, उरण तालुक्यातील उर्वरित २९ गावांतील जमिनी संपादित करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यामुळे उरण तालुका हा भूमीहीन होणार आहे. भातशेतीसाठी व भाताचे कोठार म्हणून प्रसिद्ध असलेल्या उरणची नवी ओळख निर्माण केली जाणार आहे. यामुळे उरण हे कदाचित देशातील सर्वात पहिले भूमीहीन होणारा तालुका बनण्याची शक्यता आहे. १९३४ म्हणजे ९० वर्षांपूर्वी रायगड जिल्ह्यातील अलिबाग, उरण व पेण तालुक्यातील शेतकऱ्यांनी शेती कसणाऱ्या आपल्या नावे कराव्यात यासाठी सात वर्षे पहिला शेतकरी संप केला होता. त्याच शेतकऱ्यांच्या जमिनी आता शहर आणि उद्योगनिर्मितीसाठी सरकार हिसकावून घेत असल्याने एमएमआरडीएच्या अधिसूचनेला शेतकऱ्यांनी हरकती नोंदविल्या होत्या. याकडे दुर्लक्ष करण्यात आले असल्याने शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

पचावन्न वर्षांपूर्वी सरकारने सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबईसाठी उरणच्या पश्चिम भागातील जमिनी संपादित केल्या आहेत. त्यानंतर तालुक्यात ओएनजीसी, जेएनपीटी बंदर, वायू विद्युत केंद्र,भारत पेट्रोलियम प्रकल्प, बंदरावर आधारित सेझ, उद्योग, नव्याने येणारा अलिबाग-विरार कॉरिडॉर, एमआयडीसीचा उद्योग, सिडकोचा रिजनल पार्क, लॉजिस्टिक पार्क, नवी मुंबई सेझ प्रकल्प या प्रकल्पासाठी भूसंपादन झाले आहे. तर, आता एमएमआरडीए उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील १२४ गावांतील शेतजमिनी आणि इतर जमिनींचा यात समावेश आहे.

गेल्या अनेक वर्षे नैना या सिडकोच्या विभागाची अधिसूचना जारी करण्यात आली होती. ती रद्द करून शासनाने एमएमआरडीएमार्फत अधिसूचना काढून येथील जमिनी संपादित करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. शेतकऱ्यांच्या मालकीच्या असलेल्या या जमिनींवर शेतकऱ्यांनी आपल्या भावी पिढीसाठी घरांचे बांधकाम केले आहे. या घरांचे मूळ गावाचे काय होणार, भूसंपादन करताना शासनाने २०१३ चा शेतकरी हिताचा भूसंपादन आणि पुनर्वसन कायदा का डावलला आहे, असे अनेक प्रश्न शेतकरी नेते आणि खोपटे येथील शेतकरी संजय ठाकूर यांनी उपस्थित केला आहे. यासंदर्भात आचारसंहिता लागू असल्याने एमएमआरडीएकडून प्रतिक्रिया देण्यास नकार देण्यात आला आहे.

भरारी पथकाची वाहनांवर करडी नजर

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कुठेही आचारसंहिता भंग होऊ नये, निवडणूक शांततेत व सुरळीत व्हावी या दृष्टीने भारत निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी रायगड अलिबाग व सहा. निवडणूक निर्णय अधिकारी अलिबाग यांनी भरारी पथक, आचारसंहिता पथक, स्थिर सर्वेक्षण व व्हिडिओ सर्वेक्षण पथकांची नेमवणूक केली आहे. त्या अनुषंगाने भरारी पथक मुरुड तालुक्यात २४ तास गस्त घालत आहे. प्रत्येक पक्षाच्या उमेदवारांच्या हालचालींवर व त्यांच्या कार्यकर्त्यांवर तसेच वाहतूक करणाऱ्यांवर भरारी पथकाची करडी नजर आसणार आहे.

यावेळी भरारी पथकाचे प्रमुख अमोल दोंदे, भरारी पथक प्रमुख किरण देशमुख, आचारसंहिता पथक ग्रामीणचे राजेंद्रकुमार खताळ, प्रकाश आरेकर, राजेश वाडेकर, डॉ.विनायक पवार, पोलीस शिपाई सचिन कोरे, संतोष मराडे, दत्ताराम नाईक, आचारसंहिता व्हिडिओ कॅमेरामन ओंकार चोडणेकर आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

पेणमध्ये सीसीटीव्ही कधी बसवणार?

। पेण । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण तथा तिसऱ्या मुंबईचे प्रवेशद्वार म्हणून पेणकडे पाहिले जात आहे. परंतु, दिवसेंदिवस पेणमध्ये शहरीकरण वाढत असल्याने नकळत इतर अवैध बाबीही वाढत आहेत. त्यामुळे शांतता व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस यंत्रणा कर्मचाऱ्यांच्या (मनुष्यबळ) अभावी अपुरी पडत आहे. त्यासाठी पेण शहरात जिल्हा नियोजन म्हणून सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तरतूद करून ठेवली आहे. त्याची निविदा निघून वर्कऑर्डरही ठेकेदाराला दिली आहे. मात्र, आजतागायत सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आलेले नाहीत.

निवडणुकीच्या धामधुमीमध्ये पोलीस यंत्रणेवर मोठा ताण येत आहे. सगळीकडे लक्ष ठेवणे पोलिसांना शक्य होत नाही. त्यामुळे पोलिसांचा तिसरा डोळा म्हणून सीसीटीव्ही कॅमेरे असणे गरजेचे आहे. जेणेकरून पेण शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यात पोलिसांना मदत होईल. याबाबत पोलीस निरीक्षक संदीप बागूल यांच्याशी संपर्क करून विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, १४५ सीसीटीव्ही कॅमेरे नगरपालिकेच्या माध्यमातून देण्यात येणार होते. मात्र, आम्ही सर्व शहराचा सर्वेक्षण करून १५८ कॅमेऱ्यांची गरज असल्याचे कळविले आहे. एवढ्याला काम पूर्ण होणे गरजेचे होते. पण, काम का थांबले आहे, याबाबत आमचे कर्मचारी नगरपालिकेशी संपर्क करून विचारणा करत आहेत. त्यानंतर आमच्या प्रतिनिधींनी पेण नगरपालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क करून विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, आम्ही कामाची वर्कऑर्डर दिलेली आहे. बेसिक ठेकेदाराने कामदेखील सुरू केले आहे. मात्र, मध्येच काम का थांबले आहे, याबाबत ठेकेदाराशी विचारणा करून त्याला तातडीने काम सुरू करण्यास सांगून युध्दपातळीवर पेण शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घेण्यात येतील.

पेण शहरात जर १५८ सीसीटीव्ही कॅमेरे नजीकच्या काळात बसविल्यास पेण शहरातील अनेक अवैध धंद्यांना आळा बसेल तसेच शांतता व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस यंत्रणेला मदत होईल आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या कक्षेत पेण शहर येईल.

पेणमध्ये पोलिसांचा रूट मार्च

। पेण । प्रतिनिधी ।

निवडणुकीदरम्यान शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पेण पोलीस ठाण्याकडून मुख्य मार्गावरून रूट मार्चचे आयोजन करण्यात आले होते. डी.वाय.एस.पीपासून रुट मार्चला सुरूवात झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जामा मस्जिद खान मोहल्ला, महाविर मार्ग, खाटीक मोहल्ला, पंका पाटील चौक, राजू पोटे मार्ग, एसटी स्टँड, नगरपालिका चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक आणि डी.वाय.एस.पी ऑफिस आवारात रूट मार्चचे विसर्जन करण्यात आले. या रुट मार्चमध्ये डी.वाय.एस.पी शिवाजी फडतरे, पोलीस निरीक्षक संदीप बागुल, सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील, महिला उपपोलीस निरीक्षक शिल्पा वेंगुर्लेकर यांचा समावेश होता.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विशेष बैठक

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण विधानसभा मतदारसंघात निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडावी, यासाठी निवडणूक प्रशासन सज्ज झाले आहे. यासाठी रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल, पेण आणि कर्जत विधानसभा मतदारसंघासाठी केंद्रीय खर्च निरीक्षक रमेश कुमार (आयआरएस) यांनी दि. २३ ऑक्टोबर रोजी उरण विधानसभा मतदारसंघातील निवडणूक निर्णय अधिकारी १९० उरण विधानसभा कार्यालयास सायंकाळी भेट दिली. आणि निवडणूक कामाच्या तयारीची बैठक घेऊन निवडणुकीच्या नियोजनाचा आढावा घेतला.

यात संबंधित निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडण्याबाबतच्या विशेष सूचना दिल्या. दरम्यान, निवडणूक पारदर्शक पार पडण्यासाठी वाहनांमधून बेकायदा पैसे, मद्य, किमती वस्तू नेणाऱ्यांना चाप लावण्यासाठी उरण विधानसभा कार्यालयाने भरारी पथके, स्थिर संरक्षण इत्यादी पथकांची नेमणूक केली आहे. केंद्रीय आयोगाचे आदेशाचे पालन करण्यासाठी जेएनपीटी बंदरातून होणाऱ्या वाहतुकीवर विशेष लक्ष देण्याबाबत निर्णय अधिकाऱ्यांना बैठकीत आदेश दिले आहेत.

या बैठकीस केंद्रीय खर्च निरीक्षक रमेश कुमार, उरण विधानसभेचे निवडणूक निर्णय अधिकारी जनार्दन कासार, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी उद्धव कदम, सहा. खर्च निरीक्षक सुभाष पवार, सहा. संचालक स्थानिक लेखा निधी रायगड प्रवीण वडगाये, सहा. पोलीस अधीक्षक उरण डॉ. विशाल नेहुल, विधानसभा संपर्क अधिकारी उपस्थित होते. विधानसभा निवडणूक कामावर विशेषतः एफएसटी, एसएसटी पथकाने जेएनपीटी बंदराच्या वाहतुकीवर विशेष लक्ष देण्याबाबत केंद्रीय निरीक्षकांनी सुचविले आहे.

पान १ वरून

तब्बल आठ कोटींची चांदी जप्त

पोलीस व भरारी पथकाला संशयित आढळल्याने या टेम्पोची तपासणी केली. यावेळी तब्बल आठ कोटी रुपयांची चांदी वेगवेगळ्या स्वरूपात लपून ठेवलेली आढळली. ही तपासणी खालापूर टोलनाक्यावर झाली.

खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम व वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांना खात्रीशीर माहिती मिळाली, तेव्हा ही कारवाई करण्यात आली. खालापूर पोलीस व भरारी पथकाने ही कारवाई केली. या टेम्पोत १७१ कुरिअर बॅगमध्ये लपवण्यात आलेल्या जवळपास आठ कोटी रुपयांची चांदी जप्त करण्यात आली आहे. याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत अधिक तपास खालापूर पोलीस करीत आहेत.

निवडणुकीत पोलीस दुर्लक्षित

जिल्ह्यातील अलिबाग, कर्जत, पेण, पनवेल, उरण, महाड, श्रीवर्धन या विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. २२ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालयात अर्ज भरण्यास उमेदवार येत आहेत. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी जाणारे उमेदवार, त्यांच्यासोबत असणारी मंडळी अशा एकूण पाच जणांना परवानगी देण्यात आली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या ठिकाणापासून शंभर मीटर अंतरावर गडबड होऊ नये यासाठी पोलिसांकडून लक्ष ठेवले जात आहे.

निवडणूक अधिकारी यांच्या सूचनेनुसार तसेच आचारसंहितेचा भंग होऊ नये यासाठी पोलीस रात्रीचा दिवस करून पहारा देत आहेत. अलिबागमधील उपविभागीय कार्यालयात सकाळी अकरा ते तीन यावेळेत विनाकारण कोणालाही पोलीस फिरकू देत नाहीत. भरउन्हात ते आपले कर्तव्य बजावत आहेत. परंतु, त्यांच्याकडे महसूल विभागाचे दुर्लक्ष होत असल्याची खंत पोलिसांनी व्यक्त केली आहे. स्वतःच्या खिशातील पैसे खर्च करून त्यांना पाणी व सुविधा उपलब्ध करावी लागत आहे. निवडणुकीसाठी काम करणाऱ्या महसूल कर्मचाऱ्यांना पाणी व इतर सुविधा दिली जाते. परंतु, पोलिसांना साधे पाणीदेखील विचारले जात नाही, असे बोलले जात आहे. असाच प्रकार मागील लोकसभा निवडणुकीतदेखील झाला होता. मात्र, तेथील पोलिसांनी याबाबत आवाज उठविल्यावर तात्काळ त्यांना पाणी व इतर सुविधा देण्याची कार्यवाही झाल्याची माहिती समोर येत आहे.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणारे व आचारसंहितेची अंमलबजावणी चोखपणे बजावणारे पोलीस ऐन निवडणुकीत दुर्लक्षित असल्याने नाराजीचे सूर उमटत आहेत. याकडे निवडणूक अधिकारी लक्ष देतील का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

सेवासुविधांचा अभाव

निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. महसूल विभागाबरोबरच पोलीस कर्मचारीदेखील काम करीत आहेत. निवडणुकीत काम करणाऱ्या महसूल कर्मचाऱ्यांना सोयी सुविधा दिल्या जातात. परंतु, पोलीस कर्मचाऱ्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. भरउन्हात बंदोबस्तासाठी असतानादेखील त्यांना साधे पाणीदेखील विचारत नाही, ही शोकांतिका आहे, अशी प्रतिक्रिया एका पोलीस कर्मचाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर दिली.

रिलायन्सची भिंत स्थानिकांच्या मुळावर

मात्र, ही भिंत स्थानिकांच्या व भविष्यातील पिढ्यांच्या मुळावर उठणार असल्याची संतप्त भावना येथील नागरिक मांडत आहेत.

कोणताही प्रकल्प आला तर तेथील स्थानिकांना, प्रकल्पग्रस्तांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळेल, गाव-वाड्या-वस्त्यांचा विकास साधेल ही भाबडी आशा ठेवून शेतकरी आपल्या जमिनी कवडीमोल भावाने देतात व अपवाद वगळता अनेक ठिकाणी या दिलेल्या आश्वासनाची प्रकल्पधारकाकडून पूर्तता होत नाही, तर सर्रास फसवणूकच केली जाते, ही रायगड जिल्ह्यातील वास्तव स्थिती आहे. अनेकदा प्रकल्प उभारताना हुकूमशाही पद्धतीने स्थानिकांची शेतकऱ्यांची गळचेपी करण्याचे कारस्थानदेखील होते. सद्यःस्थितीत येथील स्थानिकांमध्ये संभ्रम आणि अविश्वासाची भावना उफाळून आली आहे. तर इथं गावालगत मोठ्या जलदगतीने बांधण्यात येणाऱ्या ३० फुटी भिंतीला स्थानिक गावकरी, शेतकऱ्यांनी कडाडून विरोध करीत हे काम तातडीने थांबवावे, अशी जोरदार मागणी केली आहे. जोपर्यंत रायगड जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी यांच्यासमवेत बैठक होऊन स्थानिकांच्या, शेतकऱ्यांच्या मागणी आणि प्रश्नावर समाधानकारक तोडगा निघत नाही, तोपर्यंत गावाचा कोंडमारा करणाऱ्या या भिंतीला विरोधच राहील, अशी स्पष्ट भूमिका बेणसे झोतिरपाडा येथील ग्रामस्थांनी घेतली आहे. यासंदर्भात स्थानिकांनी आपले तक्रारी निवेदने मंत्रालयस्तरावर दिलेली असून, रायगड जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, प्रांताधिकारी पेण यांनादेखील दिलेली आहेत. मात्र, अद्याप या निवेदनांची कोणतीही दखल घेतली नसल्याची नाराजी स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

प्रांताधिकारी पेण यांनी रिलायन्स व्यवस्थापन, प्रकल्पग्रस्त, स्थानिक आणि शेतकरी यांच्या बैठकीचे आश्वासन देऊनदेखील का पाळले नाही, पोलीस अधीक्षक यांनादेखील स्थानिकांचे प्रश्न सुटेपर्यंत पोलीस बंदोबस्त देऊ नये या तक्रारी अर्जाचीदेखील घेण्यात आली नाही, असे स्थानिकांचे म्हणणे आहे. स्थानिक शेतकरी दत्ता तरे म्हणाले की, नवीन प्रकल्प उभारताना स्थानिक शेतकऱ्यांच्या मागण्या पायदळी तुडवल्या जात आहेत. प्रशासन जनतेचे आहे की धनदांडग्या उद्योजकांचे आहे. रिलायन्सकडून शेतकऱ्यांसाठी रस्त्याचे प्रयोजन काय याची कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. या भिंतीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. पुराच्या पाण्याचा मोठा धोका पिकांना बसणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अधिनियम १९६१ कलम ४२ (४)अन्वये कोणत्याही भूखंडधारकाने पाच वर्षे किंवा अधिक कालावधीकरिता सदर भूखंडाचे बांधणीयोग्य क्षेत्र वापरले नाही तर इतर कोणताही उद्योग सामावून घेण्यासाठी त्याचा वापर करता येईल. त्या अनुषंगाने स्थानिक शेतकरी सदर जमिनीवर नवीन उद्योग सुरु करण्याकामी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडे मागणी करणार आहोत, असे दत्ता तरे म्हणाले.

बौध्दजन समाज सेवा संघाचे अध्यक्ष तथा संघर्ष समितीचे अध्यक्ष बबन अडसुळे म्हणाले की रिलायन्स कंपनी बळजबरीने आमच्या बेणंसे सिद्धार्थनगर गावाला लागून ३० फुटी भिंत बांधत आहे. आमचा पिढ्यानपिढ्या असलेली वहीवाट बंद करीत आहे, आमचे वाहने पार्किंग स्थळ नष्ट करीत आहे. मुलांचे खेळाचे मैदान देखील नष्ट करीत आहे. आमच्या गावांत जाणारा येणारा रस्ता अरुंद आहे. त्यामुळे स्मशान भूमीच्या बाजूला आमची वाहने थांबवली जातात. मात्र या भिंतीमुळे आमचे व आमच्या पुढील पिढ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. बौद्धवाडी मध्ये जर कोणती आपत्कालीन दुर्घटना घडली तर रुग्णवाहीका येण्या जाण्याइतका देखील रस्ता रिलायन्स कंपनी देत नाही. हा बौद्ध समाजावर व येथील शेतकऱ्यांवर मोठा अन्याय होत असल्याचा संताप बबन अडसुळे यांनी उपस्थित ग्रामस्थांच्या वतीने व्यक्त केला.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांचे भविष्यात नव्याने होणारे प्रकल्प व इतर कामांबाबत ग्रामपंचायतीना त्याची माहिती मिळावी. तसेच ग्रामसभांना व आपणामार्फत जनसुनावणी आयोजित करून सर्व प्रकल्पाची माहिती शेतकरी व नागरिकांना मिळावी. शेतकरी, प्रकल्पबाधित नागरिक व आंबेडकरी अनुयायी यांना न्याय मिळावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. अन्यथा भविष्यात आपल्या न्याय्य हक्कासाठी मोठं आंदोलन उभारू, असा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

बैलाची चोरी करुन कत्तल

याबाबत अधिक माहिती अशी की, पेण विश्वेश्वर स्मशानभूमीच्या समोरील रिंगरोडच्या कडेला रात्री तीन वाजताच्या सुमारास अनोळखी इसमांनी एका मोठ्या बैलाची कत्तल करून त्याचे मांस एका गाडीत भरून लंपास झालेले आहेत. सदरील घटना शेजारील कारखान्यात असणाऱ्या विश्वास म्हात्रे नामक व्यक्तीने पाहिली. परंतु, अंधारत असल्याने काय चाललेय हे त्याच्या ध्यानात आले नाही. ज्यावेळी गायीचे बछडे उचलण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी विश्वास याने विरोध केला. परंतु, त्यावेळी त्या इसमांनी हत्यारे काढली. त्यामुळे तो काहीच करुन शकला नाही. दरम्यान, या कत्तल करणाऱ्या अज्ञात चोरांचा तपास पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागूल यांच्या मार्गदर्शनाखाली पेण पोलीस करत आहेत. पेण पोलिसांच्या हाती काही धागेदोरे लागले असल्याने गोधन चोरी करणारे लवकरच गजाआड होतील, असा विश्वास पोलिसांनी दर्शविला आहे.

मोडकळीस आलेले विजेचे खांब हटवले

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान शहरातील वीज वाहक तारा भूमीगत असून, त्याआधी माथेरान शहरात विजेच्या खांबावरून वीजवाहक तारा टाकण्यात आल्या होत्या. मात्र, वीज वाहक यंत्रणा भूमीगत केल्यानंतरदेखील महावितरणकडून शहरातील विजेचे खांब काढून टाकण्यात आले नव्हते. दरम्यान, महावितरणचे उपअभियंता चंद्रकांत केंद्रे आणि शाखा अभियंता सचिव आटपाटकर यांनी माथेरान शहरातील विजेचे खांब हटवण्याची कार्यवाही पूर्ण केली आहे.

महावितरणकडून १६ वर्षांनी कार्यवाही

माथेरान शहरात २००९-१० मध्ये वीज वाहक तारा या भूमीगत करण्याचा प्रकल्प राबविण्यात आला होता. शहरातील सर्व भागात असलेले जंगल आणि पावसाळ्यात झाडे कोसळून वीज वाहक तारा कोसळून वीजपुरवठा खंडित होणे आणि वीज वाहक तारा कोसळून अपघात होण्याच्या घटना घडल्या आहेत. ही बाब लक्षात घेऊन वीज वाहक तारा भूमीगत केल्याने अपघात आणि वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण कमी झाले. मात्र, त्यावेळी वीज वाहक तारा भूमीगत करण्याच्या कामे करण्याआधी माथेरान शहरात वीजपुरवठा करणाऱ्या विजेच्या तारा या खांबावरून होत होता. त्यामुळे नव्याने भूमीगत वीज वाहक तारा टाकण्याचे काम करताना जुने खांब तसेच वीज रोहित्र यांच्यासाठी उभारलेले विजेचे खांब हटवण्याची गरज होती. परंतु, महावितरणकडून मागील १६ वर्षांत असे कोणतेही काम माथेरान शहरात केले नव्हते. माथेरान शहरातील सर्व राजकीय पक्ष आणि सर्व संघटना यांच्याकडून अनेकवेळा मागणी करण्यात आली. माथेरान पालिकेने ते जुने विजेचे खांब हटविण्यासाठी ठराव पारित करून पाठवले. तरीदेखील महावितरणकडून कोणतीही कार्यवाही झाली नव्हती.शेवटी कर्जत तालुक्यात महावितरणविरोधात जनआंदोलन उभे राहिले आणि त्यात माथेरानमध्ये जुने विजेचे खांब हटवले जात नाहीत. याबाबत चर्चा झाली आणि त्यानंतर महावितरणकडून उप अभियंता चंद्रकांत केंद्रे यांनी माथेरानमधील मोडकळीस आलेल्या वीज रोहित्र यांचा विषय मार्गी लावण्याचा निर्णय घेतला.

त्यानुसार शहरात मोडकळीस आलेले सर्व वीज रोहित्र खांब आणि गावातील तसेच जंगल भागात असलेले विजेचे खांब हटवण्यात आले. त्यासाठी माथेरान महावितरणचे शाखा अभियंता सचिन आटपाटकर यांनी विशेष नियोजन करून स्थानिकांना आणि त्यांच्या व्यवसायाला कोणताही त्रास न होता सर्व खांब हटवण्याची कार्यवाही केली.

उरण पोलिसांचे संचलन

। चिरनेर । प्रतिनिधी ।

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उरण १९० विधानसभा मतदारसंघातील संवेदनशील असलेली मतदान केंद्रे, संवेदनशील परिसरात काल २५ ऑक्टोबर रोजी जासई गाव ते रांजनपाडा रिक्षा स्टॅन्ड, नव्याने उदयास येत असलेल्या द्रोणागिरी नोड वसाहत, नवीन शेवा, उरण एसटी स्टॅन्ड, चारफाटा ते राजपाल नाका, जरी मरी मंदिर, उरण बाजारपेठ, मजीद मोहल्ला, वाणी आळी, स्वामी विवेकानंद चौक, बोरी व उरण न्यायालय रोड येथे संचलन करण्यात आले. दरम्यान, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. विशाल नेहूल व उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली संचलन करण्यात आले.

उरणमध्ये होणार तिरंगी लढत

शेकाप, शिवसेना-भाजप यांच्यात चुरस

। चिरनेर । प्रतिनिधी ।

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची घोषणा झाली असून, अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. यावेळी उरण विधानसभा निवडणुकीत २०१९ प्रमाणे भाजप शिवसेना (ठाकरे) व शेतकरी कामगार पक्ष यांच्या तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या निवडणुकीतही भाजप, शिवसेना (ठाकरे) आणि शेकाप यांच्यात चुरशीच्या लढतीचे चित्र दिसत आहे.

उरण मतदारसंघात एकूण तीन लाख ३६ हजार २२० मतदार आहेत. यामध्ये एक लाख ६८ हजार ७११ पुरुष, तर एक लाख ६७ हजार ४०७ महिला मतदारांची नोंद झाली आहे. त्यानुसार २०१९ च्या निवडणुकीच्या तुलनेत ७० हजार अधिक मतदारांची नोंद झाली आहे. मागील २०१९ साली झालेल्या निवडणुकीत विजयी अपक्ष, सध्या भाजपचे उमेदवार महेश बालदी यांना ७४ हजार ५४९ तर दुसऱ्या क्रमांकावर असलेले शिवसेनेचे मनोहर भोईर यांना ६८ हजार ८३९ तर शेतकरी कामगार पक्षाचे विवेक पाटील यांना ६१ हजार ६०६ मते मिळाली होती. या निवडणुकीनंतर शिवसेनेत विभाजन झाले. मात्र, लोकसभा निवडणुकीत शेकाप व शिवसेना (ठाकरे), काँग्रेस आणि इतर पक्षांनी एकत्र येत उरण विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीला मताधिक्य मिळवून दिले. विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. त्यामुळे उरण विधानसभा मतदारसंघातील इच्छुकांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. यातून समाजमाध्यमाद्वारे प्रचार सुरू झाला आहे. तर, उरणमध्ये महाविकास आघाडीतील रस्सीखेच झाल्यामुळे ही निवडणूक तिरंगी होणार आहे.

सध्या उरण विधानसभा निवडणुकीसाठी शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना ठाकरे गट व भाजप या तीन प्रमुख पक्षांनी प्रचार सुरू केला आहे. उरण विधानसभा निवडणुकीत प्रीतम म्हात्रे यांना शेतकरी कामगार पक्षाकडून उमेदवारी मिळाली आहे. माजी आमदार मनोहर भोईर शिवसेना ठाकरे गटाकडून, तर महेश बालदी हे भाजपकडून निवडणूक लढविणार आहेत. महाविकास आघाडीच्या वतीने ठाकरे गटाकडून माजी आमदार मनोहर भोईर यांना ठाकरे गटाकडून एबी अर्ज मिळाला आहे. त्यामुळे ते सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. तर शेतकरी कामगार पक्षांनी प्रीतम म्हात्रे यांना उमेदवारी जाहीर केली असून, ते मंगळवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. शेतकरी कामगार पक्षाने अखेरीस स्वतंत्र निवडणूक लढण्याची तयारी केली आहे. या निवडणुकीत महिला आणि तरुणांची मते निर्णायक ठरणार आहेत. ते मिळविण्यावर उमेदवारांनी भर दिला आहे.

क्रा व नि

सोनसाखळी चोरांना अटक

पेण : शहरातील चिंचपाडा हद्दीत मॉर्निंग वॉक करत असलेल्या वयोवृद्ध महिलेचे मंगळसूत्र सकाळी सात वाजता दोन अनोळखी व्यक्तींनी हिसकावून नेले होते. याबाबत पेण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या अनुषंगाने पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे गुन्ह्याचा छडा लावून यातील आरोपी अजय चव्हाण (वय २२, गहुंजे,मुळशी, पुणे), आकाश चव्हाण (होराळे, खालापूर) या दोघांना अटक केली आहे.

मोहोपाड्यात विदेशी मद्य जप्त

रसायनी : दांडफाटा आपटा रस्त्यावरील पिल्लई कॅम्पसच्या गेटजवळ कारमध्ये विदेशी दारुची वाहतूक करत असताना रसायनी पोलिसांच्या हाती लागली आहे. यात विदेशी दारुच्या एकुण १४४ सिलबंद बॉटल, लंडन पिल्सनर, प्रीमियम स्ट्राँग बिअर, चार कंपनीच्या ५०० मिली क्षमतेच्या विदेशी दारुच्या एकुण २४ सिलबंद टिन असा एकूण ९४ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. याबाबत विकास सिंग शिवशंकर सिंग याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फलाटावर आढळला मृतदेह

पनवेल : पनवेल रेल्वे स्टेशन फलाट क्र.५ येथे एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत. इसमाचे अंदाजे वय ३० वर्षे, अंगात निळ्या रंगाचा कॉलरचा हाफ टी-शर्ट तसेच तपकीरी रंगाची फुल पॅन्ट आहे. या इसम ाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाणे ०२२-२७४६७१२२ किंवा श्रेणी.पोलीस उपनिरीक्षक एस.जे.वाघमारे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

दुचाकीच्या धडकेत एक गंभीर

पनवेल : अज्ञात दुचाकीच्या धडकेने रिक्षा चालक गंभीर जखमी झाल्याची घटना पनवेल ते कळंबोलीकडे जाणाऱ्या मार्गावर घडली आहे. किसन भालेकर यांनी त्यांची रिक्षा ही सावरकर चौकातून दोन खाजगी इसमांचे भाडे घेवून नवीन पनवेल येथे जात असताना ग्रीन सिग्नल लागल्यावर जात असताना उजवीकडून येत असलेल्या अनोळखी मोटारसायकलने रिक्षाला उजव्या बाजूने धडक देवून झालेल्या अपघातात रिक्षा चालक किसन भालेकर हे गंभीर जखमी झाले आहेत.

हातगाडी चालकावर गुन्हा

पनवेल : मानवी जीवास धोका निर्माण करणाऱ्या अंडाबुर्जी पाव खाद्य पदार्थाच्या हातगाडीवर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे. आकाश चव्हाण याने पनवेल बस स्टॉपच्या फुटपाथच्याकडेला अंडाबुर्जी पाव खाद्यपदार्थ विक्रीसाठी हातगाडी लावून ठेवले होते. त्यावर शेगडी ठेवून ते सिलेंडरच्या सहाय्याने पेटवून ठेवली होती. ज्वालाग्राही साहित्याचा वापर करून मानवी जीवास धोका निर्माण करणाऱ्या अंडाबुर्जीच्या हातगाडीवर कारवाई केली आहे.

म्हसळ्याची आरोग्य यंत्रणा सरस

। म्हसळा । वार्ताहर ।

रुग्णांना प्रसन्न वातावरणात योग्य उपचार व आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी शासनाने कायाकल्प पुरस्कार योजना सुरु केली आहे.रायगड जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणाही यामध्ये सहभागी झाली होती. त्यानुसार जिल्हा सामान्य रुग्णालय आणि जिल्हा आरोग्य अंतर्गत असलेल्या ६२ आरोग्य दालनांना २०२३-२४ चा कायाकल्प पुरस्कार आणि रोख रक्कम बक्षीस जाहीर झाले.

यामध्ये ४३ आरोग्यवर्धिनी, १० प्राथमिक आरोग्य मंदिर,५ उपजिल्हा रुग्णालय, तर ४ ग्रामीण रुग्णालयांचा समावेश आहे. त्यामध्ये उल्लेखनीय बाब म्हसळा सारख्या ग्रामीण, डोंगराळ आणि दुर्गम भागातील म्हसळा येथील ग्रामिण रुग्णालयाचा समावेश झाला असून म्हसळा ग्रामीण रुग्णालयास एक लाखाचे रोख बक्षीस जाहीर झाले असून हि बाब निश्चितच उल्लेखनीय आहे. या उल्लेखनिय कामगिरीमुळे तालुक्यात सर्वत्र कौतुक होत आहे.

१५ मे २०१५ पासून कायाकल्प पुरस्कार देण्यात येत आहेत. योजनेत सर्व उपजिल्हा, ग्रामीण रुग्णालय,प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्यवर्धिनी यांना सहभागी होता येते. पुरस्कारासाठी रुग्णालयांची अंतर्गत व बाह्य परिसरातील स्वच्छता, निर्जंतुकीकरण, खाट स्वच्छता, उपलब्ध साधनांचा वापर, अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता, रुग्णसेवा, जैववैद्यकीय घन व द्रवरूप कचऱ्यांची विल्हेवाट, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पाणीबचत, सांडपाण्याचा निचरा आदी प्रत्येक बाबींसाठी गुण देण्यात येतात. २०२३-२४ मध्ये आरोग्य केंद्र, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, आयुष्यमान मंदिर, उपकेंद्र आणि ग्रामीण रुग्णालयांचे परीक्षण करण्यात आले होते.

> **या योजनेअंतर्गत आरोग्य यंत्रनेचे चार टप्प्यामध्ये परीक्षण करण्यात येते. यामध्ये प्रत्यक्ष मुलाखत, रेकॉर्ड आढावा, प्रत्यक्ष रुग्णांशी चर्चा घेण्यात येतात.आरोग्य संस्था प्रमुख,व तेथील कार्यरत कर्मचारी यांचे मूल्यांकन झाल्यानंतर मूल्यांकन टक्केवारी ७० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक आली तर राज्यस्तरीय मूल्यांकन करण्यात येते या मूल्यांकनुसार पुरस्कार जहीर केले जातात. जिल्ह्यातील वरिष्ठ यांच्या मार्गदर्शनाखाली म्हसळा ग्रामीण रुग्णालयातील माझे सर्व सहकारी कर्मचारी वर्ग यांच्या मेहनतीमुळे हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.**
> **-डॉ. महेश मेथा, अधीक्षक ग्रामिण रुग्णालय म्हसळा.**

प्रियकराच्या जाचाला कंटाळून आत्महत्या

। अलिबाग । प्रतिनिधी ।

खालापूर येथील एका महिलेने प्रियकराच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. तिच्या प्रियकराने तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचा आरोप महिलेच्या भावाने केला असून याप्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात तक्रार दाखल केली आहे.

फिर्यादीच्या तक्रारीनुसार कृतिका असे मयत महिलेचे नाव आहे. ती फिर्यादीची बहिण होती. तिच्या सोबत घटस्फोट झाला होता. चार वर्षापूर्वी कर्जतमधील स्वास्ति फायनान्सकडून तिने कर्ज घेतले होते. त्या ठिकाणी काम करणाऱ्या सुशील जाधव यांच्याशी तिची ओळख झाली होती. ओळखीचे रुपांतर मैत्रीत, त्यानंतर प्रेमात झाले. गेल्या दोन वर्षापासून त्यांचे प्रेमसंबंध जुळले होते. सुशील याने लग्नाचे अमिष दाखवून तिच्याशी जवळीकता साधली होती. परंतु मागील महिन्यात त्याने लग्न करण्यास नकार दिला.

त्यामुळे कृतिकाने त्याच्याशी बोलणे बंद केले. परंतु तो तिला सतत फोन करून बोलण्याचा प्रयत्न करीत होता. अन्यथा फोटो व्हायरल करून बदनामी करण्याची धमकी वारंवार देत होता. त्याने तिला मारहाणदेखील केली होती. सतत मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळून कृतिकाने २१ ऑक्टोबर रोजी अखेर या जाचाला कंटाळून खोपोली येथील राहत्या घरी कृतिकाने सायंकाळी ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली.

सुपेगाव रस्ता बनलाय धोकादायक

। कोर्लई । वार्ताहर ।

मुरुड-रोहा प्रवासात जवळचा मार्ग असलेल्या मुरुड तालुक्यातील सुपेगांव रस्त्यालगत अनेक ठिकाणी असलेला झाडाझुडपांचा विळखा आणि अरुंद रस्ता अपघाताला आमंत्रण ठरत असून याकडे संबंधित संबंधित बांधकाम खात्याचे दुर्लक्ष असल्याबाबत पर्यटक, प्रवासी, वाहनचालक व नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे.



गेल्या तीन वर्षांपासून साईडपट्ट्या झाडाझुडुपांनी भरलेल्या असून त्या साफ करण्याची मागणी केली जात आहे.

काशिद-बिच, फणसाड अभयारण्य, मुरुड-जंजिरा किल्ला पाहाण्यासाठी रोहा सुपेगांव मार्गे वाहनांची वाढती वर्दळ असते. शासनाच्या संबंधित बांधकाम विभागाने लक्ष पुरवून झाडाझुडपांचा विळखा हटविण्यात व रस्ता रुंदीकरण करण्यात योग्य ती उपाययोजना करतील काय? असा सवाल नागरिकांतून विचारला आहे.

कोलाड पोलिसांनी दिली शालेय विद्यार्थ्यांना शस्त्रांची माहिती

। कोलाड । वार्ताहर ।

पोलीस स्मृतीदिनाचे औचित्य साधून कोलाड पोलीस ठाण्याचे प्रभारी सहा. पोलीस निरीक्षक नितिन मोहिते, गोपनिय पोलीस अंमलदार सहा. पो. उपनिरीक्षक नरेश पाटील, पोलीस हवालदार जाधव, महिला पोलीस अंमलदार निकम यांनी कोलाड खांब येथील ज्ञानांकूर इंग्लीश मिडियम स्कूलमध्ये शस्त्रांचे प्रदर्शन विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी लावले होते.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका रिया लोखंडे, रविंद्र लोखंडे, सुप्रिया पाशिलकर, ज्ञानेश्वर महाडीक रुतुजा पवार, रुपाली मरवडे, प्रज्ञा माने, प्रतिक्षा धामणसे, निलम दळवी, प्रिया चिकणे आदी शिक्षकवर्ग, विद्यार्थी उपस्थित होते.

सहा. पोलीस निरीक्षक मोहिते, गोपनिय अंमलदार पो. उपनिरीक्षक नरेश पाटील, हवा. नरेश जाधव, महिला पोलीस अंमलदार पूनम निकम यांनी विद्यार्थ्यांना शस्त्रांस्त्रांची माहिती देवून त्याचा उपयोग कसा केला जातो, याबाबत मार्गदर्शन केले. पोलीस खात्याची माहिती देवून पोलिसांच्या स्मृतीदिनाबाबत माहिती देवून दिवस का साजरा केला जातो, याबाबत माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांना शस्त्रे हाताळण्यास दिली.

पोलिसांकडील एस.एल.आर. पिस्टल, कार्बाइन गन, पंप ॲक्शन गन, हातकडी, तसेच विविध दारुगोळा पाहून तसेच सदरची शस्त्रे हाताळून विद्यार्थी, शिक्षकवर्गाने माहिती जाणून घेतली. अशा प्रकारची शस्त्रे आपण चित्रपटात पहातो परंतु प्रथमतः सदरची शस्त्रे हाताळण्यास मिळाल्याने विद्यार्थी खुश होते.

हौशी गायकांकडून शांततेचा भंग

वडाळे तलावाभोवती वेगवेळ्या ठिकाणी स्पीकर लावून मोठ्या आवाजात गायली जाताहेत गाणी

। पनवेल । वार्ताहर ।

शहरातील नागरिकांच्या आकर्षणाच केंद्र बिंदू असलेल्या ऐतिहासिक वडाळे तलावाभोवती सध्या हौशी गायकांनी हैदोस घातल्याचे पाहायला मिळत आहे. सायंकाळच्या वेळी तलावा भोवती विविध ठिकाणी स्पीकर लावून मोठं मोठ्या आवाजात गाणी गायली जात असल्याने गाण्याची स्पर्धा तलाव परिसरात भरली आहे कि काय असा सवाल या मुळे तलाव परिसरात फेरफटक्यासाठी येणाऱ्या नागरिकांना पडत आहे. पनवेल शहरातील वडाळे तलावाला ऐतिहासिक महत्व आहे.

विविध प्रजातीच्या पक्षांचे आश्रयस्थळ असलेल्या या तलावाचे पालिकेच्या वतीने सुशोभिकरण करण्यात आले आहे. करोडो रुपये खर्चून करण्यात आलेल्या या सुशोभिकरणामुळे तलावाच्या सुंदरतेत भर पडली आहे.सुशोभिकरण करताना तलावाचे ऐतिहासिक स्वरूप टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, तलावाभोवती दगडी संरक्षक भिंती,पायऱ्या तसेच जॉगिंग ट्रॅक तयार करण्यात आला आहे. तलाव परिसरात बसवण्यात आलेली आकर्षक रोषणाई सायंकाळच्या वेळी तलावाच्या सुंदरतेत आणखी भर घालत असल्याने पनवेल परिसरात राहणारी आपल्या मुलाबाळासोबत फेरफटका मारण्यासाठी तर अनेक ज्येष्ठ नागरिक शांततेच्या शोधात तलाव परिसरात येतात मात्र त्याच वेळी कर्णकर्कश आवाजात स्पीकर लावून गाणी गाणारे हौशी गायक वेगवेगळ्या भागात गाणी गात असल्याने शांततेच्या शोधात आलेल्या नागरिकांच्या शांततेचा भंग होत असल्याच्या तक्रारी नागरिक करत आहेत.

सुरक्षा रक्षक त्रस्त

तालावच्या सुरक्षिततेसाठी पालिकेच्या वतीने सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले आहेत.तलावावर येणारे अनेक नागरिक हौशी गायकांमुळे होणाऱ्या त्रासाबाबतीत सुरक्षा रक्षकांकडे तक्रार करतात. मात्र हे हौशी गायक सुरक्षा रक्षकांना जुमानत नसल्याची माहिती नाव न सांगण्याच्या अटीवर दिली आहे.

एकमेकांची तक्रार

हौशी गायकांचे वेगवेगळे गट असल्याने ते एकमेकांबद्दल तक्रार करत असल्याची माहिती सुरक्षा राक्षकांनी दिली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार आमच्या कडे गाणी गायची रीतसर परवानगी असल्याचे सांगत दुसऱ्या गटाला गाणे गायला देऊ नका, अशी मागणी दुसऱ्या गटाकडून केली जात आहे. मात्र परवानगी दाखवण्याची मागणी केल्यावर मात्र परवानगी दाखवली जात नसल्याची माहिती सुरक्षा रक्षकांनी दिली आहे.

कोकणात गुलाबी थंडीची चाहूल

। कोलाड । वार्ताहर ।

१५ ऑक्टोबर पासुन परतीचा पाऊस जाईल असा अंदाज वर्तवला जात होता. यानंतर हिवाळा सुरु होईल असे वाटत होते. परंतु त्यानंतर ही २३ ऑक्टोबरपर्यंत वीज वाऱ्यासह जोरदार तुफान पाऊस सुरु होता.

यामुळे या परिसरातील भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे. नंतर दोन तीन दिवसापासून पावसाच्या जाण्याने तापमानात बदल झाला असुन उशिरा का होईना? कोकणात गुलाबी थंडीची चाहूल लागली असून ऑक्टोबर हिटमध्ये नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

शुक्रवारपासून गुलाबी थंडीची चाहूल लागली असुन कोकणातील सौंदर्यात आता भर पडणार आहे. कोकणातील वळणावळणाचे घाट रस्ते आणि त्याचे सौंदर्य थंडीच्या चाहुलीने अधिक खुलले आहे. धुक्यातून अंधुक दिसणारे डोंगर व इथली लपवाछपवीचा डाव खेळणारी हिरवाई, वळणावळणावर हरवलेला रस्ता हा आनंद वेगळा दिसून येत आहे.

एनएमएमटी बससेवा पूर्ववत करा

प्रवाशांची मागणी

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण मधील प्रवाशांची जीवनरेखा असलेली नवी मुंबई महानगरपालिकेची एनएमएमटी बस सेवा बंद आहे. त्यामुळे येथील ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थी त्रस्त झाले आहेत. प्रवाशांची होणारी ही गैरसोय थांबवी. यासाठी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांना साकडे घातले आहे.

अद्याप बस सेवा सुरु न झाल्याने पुन्हा एकदा ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांनी आर्त साद घातली आहे. एनएमएमटी बस मधून उरण नवी मुंबई असा दररोज आठ ते दहा हजार प्रवासी प्रवास करीत होते. ही सेवा पूर्व सुरू करण्याच्या म ागणीसाठी किसान सभा, मॉर्निंग कट्टाच्या ज्येष्ठ नागरिकांनी पुढाकार घेत सह्यांची मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेला सर्व स्तरातील नागरिकांनी प्रतिसाद दिला आहे. या सह्यांचे निवेदन दिल्यानंतर नवी मुंबई म हानगरपालिका आयुक्तांनी सेवा पूर्वव त करण्याचे आश्वासन दिले आहे. फेब्रुवारीमध्ये खोपटे येथे झालेल्या भीषण अपघातानंतर नवी मुंबईसाठी प्रवाशांची जीवनरेखा ठरलेली एनएमएमटी बस सेवा व्यवस्थापनाने काम गारांची सुरक्षा आणि तोट्यात चालणारा मार्ग ठरवून अनिश्चित काळासाठी बंद केली आहे.

अनिल पाटील वाचनालयात जन्मदिवस साजरा

। वाघ्रण । वार्लहर ।

अलिबाग तालुका पंचायत समितीचे माजी सदस्य कै. अनिल रमाकांत पाटील यांचा ६१ वा जन्मदिवस २१ ऑक्टोबर २०२४ रोजी त्यांच्या नावाने वाघ्रण येथे सुरु असलेल्या वाचनालयात साजरा करण्यात आला.

उपस्थित सर्व संचालक मंडळाचे स्वागत ग्रंथपाल दिपक पाटील यांनी केले. त्यानंतर आदरांजली वाहण्यात आली. ज्येष्ठ सभासद विनायक म्हात्रे यांनी श्रीफळ वाढवले. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष उदय रमाकांत पाटील यांनी वाचनालयाचा मागील २० वर्ष आणि भविष्याचा आढावा घेतला. या कार्यक्रमाला संचालक तुकाराम पाटील, गजानन पाटील, किरण पाटील, प्रमोद पाटील, सुनिल पाटील, दयानंद म्हात्रे, वाचक रविकीरण पाटील, लोचना पाटील आदी उपस्थित होते.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक अनंता बाबु जोशी यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे -

मौजे-गुढवण तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर	क्षेत्र (हे.आर.पॉ)	आकार (रु.पै.)
७७/२५	एकुण क्षेत्र ०-९३-३० हे आर पॉ यापैकी मालक यांचे मालकीचे क्षेत्र ०-२१-०० हे आर पॉ	०-३५ ०-०९

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास. तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक २७/१०/२०२४ **ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा.९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

अर्जदारातर्फे वकील
ॲड.गणेश शां.भगत

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात.

दिवाणी चौकशी अर्ज नं.-१८९/२०२४

अक्षदा अनिल चौलकर अर्जदार
वगैरे ४

विरूद्ध

कोणीही नाही सामनेवाले

सर्व लोकांना जाहिर नोटीसव्दारे असे कळविणेत येते की, अक्षदा अनिल चौलकर वगैरे ४ यांनी कै.अनिल वामन चौलकर यांचे वारस असलेबाबत दाखला मिळणेकरिता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट VII ऑफ १८२७ अन्वये अर्ज केला आहे.

सदर अर्जदारांव्यतिरिक्त कै.अनिल वामन चौलकर यांना अन्य कोणीही वारस नाही असे अर्जदार यांचे कथन आहे.

अर्जदार यांचे व्यतिरिक्त कै.अनिल वामन चौलकर यांचे अन्य कोणीही वारस असल्यास त्यांनी या न्यायालयात दिनांक ०७/०२/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता समक्ष अगर योग्य ते अधिकारी व माहिती दिलेल्या प्रतिनिधीमार्फत हजर राहुन आपले लेखी म्हणणे सादर करावे.

दिनांक ०७/०२/२०२५ रोजी जाहीर नोटीसला अनुसरून अन्य कोणीही आपला हक्क अधिकार सांगितला नाही तर हे न्यायालय अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला जारी करणेची पुढील कारवाई करेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आजरोजी दि.२७/१०/२०२४ न्यायालयाच्या शिक्क्यानिशी व माझे सहीनिशी जाहीर केले.

कनिष्ठ लिपीक **अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अलिबाग

जाहीर नोटीस

माझे अशिल श्री.संतोष धोंडीराम घोंडविंदे यांनी खाली नमूद केलेली दुकान गाळा मिळकत मिळकतीचे मालक १. श्री.महेश रामचंद्र परदेशी २ सौ.राजश्री महेश परदेशी यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे दहिवली तर्फे नीड ता. कर्जत जि. रायगड येथील सि.स.नं. ५०९ यावरील श्रीधर या इमारतीमधील तळमजल्यावरील दुकान गाळा नं. १० क्षेत्र १६१ चौरस फुट सुपर बिल्टअप

वरील वर्णनाच्या दुकान गाळा मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक २७/१०/२०२४ **ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु.पो.चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड
मो.नं.९०४९४८६८०५

जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची बिनशेती मिळकत त्याचे मालक हुतोक्षी आदी भरुचा यांचेकडून कायमची विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णनः

मौजे.मोहिली तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत

अनु. क्रं.	सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर	क्षेत्र (चौरस मीटर)	आकार (रु.पैसे)
१	१६/१	१-००-००	१००.००
२	१६/२	१६-००-००	१६०.००
३	१६/३	२९-००-००	२९०.००
४	१६/४	९-००-००	९०.००
५	१६/५अ	७४-००-००	७४०.००
६	१६/७	७-००-००	७०.००
	एकूण	१३६-००-००	

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे.

वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २७ ऑक्टोंबर २०२४ **(सुमित साहेबराव साबळे)**
ॲडव्होकेट
ऑफिस नंबर ३, तळ मजला, साई विला अपार्टमेंट
सम्राट नगर मु. पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मोबाईल क्रं. ७७१९९४४५५८/८१४९२३६७६५

जाहीर नोटीस

पेण येथील में तहसीलदार तथा न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात

श्री. सौरभ कमळाकर म्हात्रे अर्जदार
रा. जोहे ता. पेण जि. रायगड
विरुध्द
ग्रुप ग्रामपंचायत जोहे सामनेवाला

सर्व तमाम जनतेस कळविण्यांत येते की, अर्जदार यांचा जन्म मौजे जोहे ता. पेण जि. रायगड येथे दि.२३/०३/२००३ रोजी झालेला असल्याने त्यांच्या जन्म तारखेची नोंद ग्रुप ग्रामपंचायत जोहे यांचे कार्यालयांतील जन्म नोंद रजिस्टरला नोंद करणेबाबत सदरचा अर्ज कोर्टात दाखल केलेला आहे.

तरी सदर अर्जास कोणाचीही हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे मुदतीत आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह में कोर्टात दाखल काराव्यात. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचा अर्ज मागणी प्रमाणे मंजूर करण्याचे आदेश पारित करण्यात येतील व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस माझ्या सही शिक्यानिशी आज दि. १४/१०/२०२४ रोजीचे सही ने दिली

सही/-
(तानाजी शेजाळ)
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी पेण

दिनांक : २७ ऑक्टोंबर २०२४

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. जसाराम केसारामजी राठौड रा. सी/०९/२-१२, निवारा को.ऑप.हौ.सो.लि.सिवुड्स हॉस्पिटल समोर, सेक्टर ४६, सिवुड्स, नेरुळ (प), नवी मुंबई. मोबाईल नं. ९८९२१२१२१३ यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेले मालक-दामोदर जगन्नाथ साहू व मान्यता देणार-गजानन बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स यांचेकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.चौ.मिटर	आकार रुपये	आकार पैसे
६४	१/अ/२/अ	०-२२-३०	४	४८

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही / -

कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका), पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

अल्पेश अनंत कराळे
(ॲडव्होकेट)
दिनांक :- २७/१०/२०२४
मो.नं.९९२२३६८१२१

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

मौजे भार्जे, ता. सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकती.

मिळकतीचे वर्णन :-

जमिन मालकाची नांवे	गट/ स.नं.	क्षेत्र हे.आर.	आकार रु. पैसे
श्री. धनराज लादुमल ओसवाल श्री. धनंजय लादुमल ओसवाल	५०९	०-३९-००	०-१७
	५०७	०-०७-००	०-०३
	५१०	०-६३-००	०-२८

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे. सही/-
दिनांक :- २७/१०/२०२४ खरेदीदारांचे लेखक
राठोड एण्ड एसोसिएट्स
श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,
श्री. राजेश एस. राठोड
२८६अ राठोड सदन ऑफिस नं.८ पाली,
ता.सुधागड, जि. रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-झिराडपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) मंजिरी महेश हसबनीस व २) समीर उर्फ हरीभाऊ गजानन कर्वे यांचे कडून कायम मालकी हक्क विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या करीता त्यांचे मालकी हक्क आमचे अशील यांनी तपासणेचे ठरवीले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै)
झिराडपाडा, ता.अलिबाग	९१	जिरायत ०१.२८.६० बागायत ००.००.५० वरकस ०१.६५.९० इतर ००.०३.०० पो.ख. ००.७०.४० एकूण ०३-६७-८०	३३.७१

सदर मिळकतीमध्ये असणार १) मंजिरी महेश हसबनीस व २) समीर उर्फ हरीभाऊ गजानन कर्वे यांचे नावे असणारे ०२.५८.९०. हे.आर. पो.ख. ००.७०.४०. हे. आर एकूण क्षेत्र ०३.७०.३०. हे. आर. क्षेत्र पैकी ००.४२.६० हे. आर. क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे

वर वर्णन केल्याप्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकती वर अथवा तिचे कोणत्याही भागावार कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क या व अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण: अलिबाग **ॲड. राहुल रमेश नाईक**
दिनांक २६/१०/२०२४ मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-खालापुर, ता.खालापुर, जि.रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) मंजिरी महेश हसबनीस व २) समीर उर्फ हरीभाऊ गजानन कर्वे यांचे कडून कायम मालकी हक्क विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या करीता त्यांचे मालकी हक्क आमचे अशील यांनी तपासणेचे ठरवीले आहे.

जमिन मिळकतींचे वर्णन

मौजे कोपरी, ता. खालापुर, जि. रायगड येथील

भोगवटादारांची नावे	स.नं.	हि.नं.	क्षेत्र हे.-आर.चौ.मी.	आकार रु. पै.
रजनीकांत मोतीलाल शहा नरेंद्र मोतीलाल शहा हेमंत मोतीलाल शहा	५०	३	१-५४.८०	०.९७
	५१	२	१-०६.९०	५.६२

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार यांचे व्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील रजनीकांत मोतीलाल शहा वगैर ३ यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल **श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
दि.:२७/१०/२०२४. पत्ता : फ्लॅट नं. ए-२,जय नगर को.ऑप हौ. सोसा. लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८
tushar.deore82@gmail.com

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ अलिबाग मधील क्लीनिक व वेलनेस सेंटरसाठी पुरूष मदतनीस पाहिजेत, वयाची शिक्षणाची अट नाही
मो. ९२२६७६६१२९/९३७०५१७९४९

■ प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

■ सन स्टोन रीयल इस्टेट साईना कॉम्प्लेक्स बायपास रोड चर्चच्या समोर N.A. प्लॉट अलिबाग परिसरात आहेत. लहान फार्म हाऊस प्लॉट स्वतंत्र ७ X १२ ८६६९००६९०२, ९२७०८८८८०३

■ कल्पवृक्ष रिसॉर्ट वरसोली येथील किचन चालवायाला देणे आहे. संपर्क - ९३७३९७८९२५/ ९६८९५६७१०१

■ अलिबाग एस टी स्टॅन्डजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे ९७६४५४८६७९

■ आयुर्विमा ऑफीस कामासाठी महिला पाहिजे पत्ता विजयनगर-वरसोली, वरसोली नाक्याजवळ मो.९४२२४९४५९०/७५०७९२९१२८

■ सर्वसामान्यांना परवडणाऱ्या किंमतीतील घर पोयनाड अलिबाग येथे उपलब्ध Collector /Bank Approved Project 1RK & 1BHK. Starting price 12.25 Lac Onwards. Diwali Offer. Booking 50,000 /- only Call + 7700999220/ 9022272212.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२७ ऑक्टोबर

१) श्रीम. हौलुबाई लक्ष्मण करजेकर
वरसोली, २७-१०-१९५०

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

मिथिल शांतीलाल जैन व पिंकी विशाल जैन, वाढदिवस, अलिबाग

दारूचा साठा जप्त

पालघर : अगामी निवडणूकीच्या अनुषंगाने केंद्र शासित प्रदेशातून पालघर जिल्ह्यात होणाऱ्या मद्य तस्करीवर आळा घालण्यासाठी दिवसरात्र गस्त आणि करडी नजर ठेवली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार उधवा- तलासरी रस्त्यावर दमण बनवटीच्या दारूची तस्करी होणार असल्याची माहिती उत्पादन शुल्क विभागाला मिळाली होती. यावेळी विभागाच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी पहाटे उधवा-तलासरी रस्त्यावर सापळा रचला होता. यावेळी संशयीत टेम्पो थांबवून टेम्पोची तपासणी केली असता टेम्पोमध्ये विशेष पॅकिंग करुन पुट्ठ्ठांच्या खोक्यात लपवून ठेवलेला दमन बनावटीचा दारूचा साठा आढळून आला. तपासणीत आढळलेला ८० बॉक्स दारूचा साठा आणि टेम्पो जप्त करण्यात आला आहे.

पशुधनाची घटती संख्या एक चिंतेची बाब

। पालघर । प्रतिनिधी ।

गेल्या काही वर्षांपासून शेतकऱ्यांकडे असलेले पशुधन वाढण्या ऐवजी त्याच्यात कमालीची घट होऊ लागली आहे. यामुळे भविष्यात येथील शेतीमध्ये सेंद्रिय खताचा अभाव तर दिसून येईलच, पण गावोगावी मिळणारे गायी, म्हैशीच्या दुधा ऐवजी अन्य देशांतून आयात होणाऱ्या दुधाच्या पावडरचे प्रमाण वाढेल. यामुळे ही शेतकऱ्यांबरोबर सर्वांसाठी चिंतेची बाब ठरणार आहे.

देशाची अर्थिक राजधानी आणि जागतिक बाजारपेठ असलेल्या मुंबई शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या पालघर जिल्ह्यात काही वर्षांपूर्वी कोटीच्या संख्येत पशुधन होते. या जिल्ह्यातून दररोज लाखो लिटर दूध मुंबई बाजारपेठेत जात होते. तर या जिल्ह्यातील संपूर्ण शेतीमध्ये येथील पशुपासुन मिळणाऱ्या शेणखत वापर केला जात होता. या जिल्ह्यातील वाडा तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पिकवला जाणारा वाडा कोलम सेंद्रिय खतामुळेच नावारूपाला आला होता.

दर पाच वर्षांनी पशुगणना केली जाते. पालघर जिल्ह्यात करण्यात आलेल्या सन २०१२-१३ च्या पशुगणनेमध्ये ३ लाख ९६ हजार पशुधन (गाय, बैल, म्हैस, रेडा) होते. यानंतर सन २०१७-१८ मध्ये करण्यात आलेल्या पशुगणनेमध्ये ही संख्या ३ लाख ८ हजार ६३७ पर्यंत आली आहे. म्हणजेच पाच वर्षांत ८७ हजारांहून अधिक पशुधन घटले आहे. सन २०२२- २३ ची पशुगणना पूर्ण झालेली नाही. मात्र, या पशुगणनेमध्ये पशुधनाची कमालीची संख्या कमी झाली असून हा चिंतेचा विषय बनला आहे.

गायरानावर जमिनींवर अतिक्रमण

ब्रिटिश राजवटीत महसुल गावांची निर्मिती करताना संबंधित गावाच्या एकूण क्षेत्रापैकी १० टक्के क्षेत्र हे गायरान (गुरचरण) क्षेत्र ठेवण्यात आले होते. या राखीव क्षेत्रावर गेल्या ७५ वर्षांत अतिक्रमण होऊन ते फक्त दोन टक्के शिल्लक राहिले आहे. अनेक गावांमध्ये नव्याने वाढत असलेल्या वस्त्यांसाठी गावठाण उपलब्ध होत नसल्याने गावालगतच्या गायरान जमिनींवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झालेले दिसून येत आहे.

> **दुधाळ जनावरांच्या वाढलेल्या किंमती व वाढलेले खाद्याचे दर यामुळे दुधाचा व्यवसाय शेतकऱ्यांसाठी फायदेशीर राहिलेला नाही. यामुळे दुधाळ जनावरांची संख्या कमी झाली.**
> **– लक्ष्मण पाटील, शेतकरी, वाडा**

> **बैलगाडी, लाकडी नांगर हे कालबाह्य ठरल्याने तसेच नोकरी, व्यवसायाकडे लोकांचा कल वाढल्याने पशुधनाची संख्या कमी होऊ लागली आहे.**
> **– डॉ. प्रकाश हसनालकर, जिल्हा पशुधन अधिकारी, जि.प. पालघर**

हरणाची शिकार करणाऱ्याला अटक

। ठाणे । प्रतिनिधी ।

अंबरनाथ एमआयडीसी परिसरात दुर्मीळ पिसोरा जातीच्या हरणाची शिकार करणाऱ्याला वनविभागाच्या आधिकाऱ्यांनी अटक केली आहे. जगदिश वाघ (२५) असे शिकार करणाऱ्याचे नाव आहे. अंबरनाथ आनंदनगर एमआयडीसी परिसरात २३ सप्टेंबर रोजी पिसोरा हरणावर तीन गोळ्या झाडल्याने ते गंभीर जखमी झाले होते. गोळी लागल्याने हरिण पळताना उंचावरून खाली पडल्याने ते अनेक ठिकाणी जायबंदी झाले होते. जखमी हरणाला बदलापूर वनविभागाने तात्काळ बोरीवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वनविभागाच्या पशुवैद्यकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान हरणाचा २६ सप्टेंबर रोजी मृत्यू झाला होता.

मद्य वाहतुकीचा ट्रक पलटी



। पालघर । प्रतिनिधी ।

मोखाड तालुक्यातील तोरंगण घाट जेवढा निसर्गरम्य मनमोहक आहे, तेवढाच जीवघेणाही आहे. हा घाट रस्ता त्र्यंबकेश्वरच्या आंबोलीपासून वालब्रिज पुलापर्यंत तीव्र उताराचा आणि नागमोडी वळणे असलेला आहे. वाहनाचे ब्रेक निकामी होऊन अपघात होण्याचे प्रसंग नेहमी घडत असतात. अशातच शुक्रवारी सकाळी औरंगाबाद येथून गुजरातच्या दिशेने मद्य घेऊन जाणाऱ्या चट्रकचा तोरंगण घाटात अपघात झाला. यात वाहनातील मालाचे आणि वाहनांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

पालघर जिल्ह्यातून गुजरात पर्यंत मालवाहतूक वाहनांची मोठी रेलचेल असते. मात्र, घाट रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्या वाहनांचे चालक हे नवीन असतात किंवा आंबोली पासून वाहन चालक गाडीचे ब्रेक लावत येत असतात. यामुळे तोरंगण घाटात पोहचेपर्यंत गाडीचे ऑईल गरम होऊन ब्रेक फेल होतात. यामुळे अपघाताच्या ठिकाणी तीव्र उतार असल्याने गाडीचे ब्रेक लागत नाहीत आणि अपघात घडत असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. याच पध्दतीने शुक्रवारी सकाळी औरंगाबाद येथून गुजरातकडे जाणाऱ्या गाडीचा अपघात झाला असल्याचे समोर आले आहे.

रत्नागिरी-कोल्हापूर मार्गावर भीषण अपघात

महावितरणच्या कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

रत्नागिरी शहराजवळील टीआरपी आदिनाथ नगर रस्त्यावर डंपर आणि दुचाकी यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात महावितरणच्या दोन कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. डंपर चालकाविरुद्ध शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून मिऱ्या-नागपूर या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामामुळे हा भिषण अपघात झाला असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे. राघो कृष्णा धुरी (६८), मुक्तेश्वर सहदेव ठिक (५८) अशी अपघातात मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांची नावे असून दोघही रत्नागिरी मधील रहिवासी आहेत. हा अपघात शुक्रवारी (दि.२५) सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार राघो धुरी हे महावितरणचे निवृत्त अधिकारी होते. तर, मुक्तेशवर ठिक हे महावितरण येथे कार्यरत होते. शुक्रवारी सकाळी धुरी हे दुचाकीवरून सोबत मुक्तेश्वर ठिक यांना घेऊन मारुती मंदिर मार्गे नाचणेरोड वरील त्यांच्या महावितरण कार्यालयाकडे येत होते. टीआरपी येथे आले असता समोरुन येणाऱ्या एसटीला त्यांनी बाजू दिली. मात्र, रस्त्याच्या कामामुळे खडीवरुन दुचाकीवरील ताबा सुटून दोघही खाली पडले. याचवेळी रस्त्यावर हातखंबाहून येणाऱ्या डंपर चालक नागेश शंकर कट्टेमणी (३२) हा वेगाने येत होते. त्याचा डंपरवरील ताबा सुटला आणि डंपर त्या दोघांच्याही डोक्यावरुन गेला. यात या दोघांचाही जागीच मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षकांसह पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करुन दोघांचे मृतदेह जिल्हा रुग्णालयात दाखल केले. या प्रकरणी नातेवाईकांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून तक्रारीवरुन पोलिसांनी संशयित डंपर चालकावरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास शहर पोलिस ठाण्याचे अमलदार करत आहेत.

साप्ताहिक राशिभविष्य २७ ऑक्टोबर ते ०२ नोव्हेबर २०२४

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८



तुमच्या प्रतिष्ठेत वृद्धी हाईल

मेष : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्ही कुटुंबातील बऱ्याच जबाबदाऱ्यांना पूर्ण कराल यामुळे तुमच्या प्रतिष्ठेत वृद्धी होईल. तसेच, तुमचा समाजात मानसन्मान ही वाढेल आणि तुम्ही एक प्रसिद्ध व्यक्ती म्हटले जाल. प्रेम जीवनासाठी या कालावधीत बरेच अनुकूल राहील आणि तुमच्यातील काही लोकांना विवाहाची वार्ता ऐकण्याची संधी मिळेल. तुम्ही तुमच्या प्रियतमला आपले बनवण्यास यशस्वी राहाल. तथापि, विवाहित लोकांच्या दांपत्य जीवनात चढ उताराची स्थिती राहू शकते. तुम्हाला काळजी घ्यावी लागेल की तुम्ही तुमच्या कामा व्यतिरिक्त जीवनसाथीला पर्याप्त वेळ द्या. तुम्हाला मान सन्मानाची प्राप्ती होईल. शिक्षणाच्या क्षेत्रात तुम्हाला कठीण परिश्रम करावे लागेल, तेव्हाच तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. आर्थिक दृष्टीकोनाने या कालावधीत थोडे कमजोर राहू शकते. म्हणून, पैशाचा हिशोब चांगल्या पद्धतीने ठेवा. **महिलांना-** भाऊ बहिणीची काळजी घेणे उत्तम राहील. संतानसाठी या कालावधीत अधिक अनुकूल नाही म्हणून वेळोवेळी त्यांची काळजी घ्या आणि त्यांना प्रोत्साहित करा. **शुभ दिनांक-** ३०,२.

खर्चावर योग्य नियंत्रण ठेवा

वृषभ : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विविध प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे व त्यातून मार्ग काढा. आठवड्याच्या पूर्वार्धात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे, पण यानंतर मात्र मनासारखी कामे होऊ लागतील. कौटुंबिक वातावरण चांगले ठेवण्याचा प्रयत्न करा. घरातील व्यक्तींकडे जास्त लक्ष द्या. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. आर्थिक बाजू ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल. अनावश्यक खर्च टाळा. प्रकृतीस्वास्थ्य जपा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आठवड्याच्या मध्यावर आपल्या खर्चावर योग्य नियंत्रण ठेवणे हितकारक ठरेल. प्रवासात सावध राहा. स्थावर-जंगम बाबतीतील प्रश्नांना चालना मिळेल. कलाकार व्यक्तिंना बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल व व्यापारी व्यक्तिना उद्योगधंद्याला चालना मिळेल. आप्तेष्ट मंडळींच्या संपर्कात राहाल. सामाजिक कार्यात अग्रेसर राहाल. **महिलांना-** धार्मिक कार्यात सहभागी होण्याची संधी प्राप्त होईल. प्रत्येक बाबतीत जुळवून घेण्याचा प्रयत्न करा. जोडीदाराची साथ मिळेल. अचानक एखादी भेट वस्तु मिळेल. घरातील लहान मुलांवर लक्ष ठेवा. **शुभदिनांक-**२९,१.



आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका

मिथुन : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात कौटुंबिक स्थिती सुरवातीमध्ये बरीच चांगली राहील. परंतु, मध्यात कुठल्या जमिनीच्या गोष्टीला घेऊन घरातील मोठ्या लोकांसोबत वाद होऊ शकतो. करिअरच्या दृष्टीने तुम्हाला यावेळी चांगली संधी प्राप्त होईल. यामुळे तुमच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधार होईल. या कालावधीत कुणासोबत देवाण-घेवाण करू नका. कुठल्या यात्रेवर गेले तर आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. आपल्या सोबत यात्रेच्या वेळात दुर्घटना होण्याची शक्यता आहे. संतानाकडून या कालावधीत चांगली बातमी ऐकायला मिळेल. तुम्ही आपल्या घरात काही मंगल कार्य संपन्न करवून घेऊ शकता. तुम्हाला आपल्या कार्यात यश मिळेल आणि उत्तम धनलाभ प्राप्ती होईल. तुम्हाला तुमच्या प्रियजन, मित्र आणि जवळच्या लोकांसोबत भेटण्याची संधी मिळेल. **महिलांना-** जे काम तुम्ही करता त्यात तुमचे श्रेष्ठ प्रदर्शन सुरु ठेवा. कारण तुम्हाला त्या मेहनतीचे पूर्ण परिणाम प्राप्त होईल आणि काही संधी तुम्हाला मिळू शकतात. तुमच्या कौटुंबिक जीवनात काही समस्या राहू शकतात. परंतु, तुम्ही तुमच्या संवेदनशील पणामुळे चांगल्या प्रकारे आव्हानांवर विजय प्राप्त कराल. **शुभदिनांक-** २७,३०.

संतान सुख मिळण्याचा योग

कर्क : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरवात चांगली नसेल, परंतु शेवट बराच चांगला असेल. सुरवातीला तुम्ही तणावात येऊ शकता. यामुळे तुमची कौटुंबिक स्थिती बिघडू शकते. महिन्यात तुम्हाला एक अश्या नोकरीची ऑफर येईल जे तुमचे आयुष्य बदलू शकते. या कालावधीत तुम्ही कामाच्या निमित्ताने परदेशात जाऊ शकतात. निःसंतान दांपत्याला या कालावधीत संतान सुख मिळण्याचे पूर्ण योग आहेत. हा कालावधी तुमच्यासाठी थोडा आव्हानात्मक राहील. या काळात कुठे ही गुंतवणूक करू नका आणि कुठली ही नवीन गोष्ट खरेदी करू नका. वैवाहिक जीवन आनंदी राहील आणि कुठली ही मोठी समस्या येणार नाही. सासरच्या पक्षात तुमचा मान सन्मान वाढेल आणि प्रत्येक मोठ्या कामात तुमचा सल्ला घेतला जाईल. समाजाच्या सन्मानित आणि मोठ्या व्यक्तींचा आशीर्वाद तुम्हाला प्राप्त होईल. यामुळे तुम्हाला कामामध्ये यश मिळेल. **महिलांना-** अधिक व्यस्ततेने तुम्हाला थकवा येऊ शकतो आणि याचा प्रभाव तुमचे काम आणि शरीरावर पडू शकतो. म्हणून कामाच्या व्यस्ततेमध्ये ही वेळ नक्की काढा. तुमची अधिकांश इच्छा या कालावधीत पूर्ण होईल. कुठल्यातरी अनुभवी व्यक्तीचा तुम्हाला साथ मिळेल. **शुभदिनांक-** २८,२९.

आर्थिक स्थिती मजबूत राहील

सिंह : एकूण ग्रहमान पाहता हा सप्ताह नवीन आनंद घेऊन येईल. या कालावधीत तुमची आर्थिक स्थिती खूप मजबूत राहील. व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींसाठी हा कालावधी खूप शुभ आहे. करिअरमध्ये तुम्हाला बऱ्याच चढ-उतारांचा सामना करावा लागू शकतो. याच्या व्यतिरिक्त तुमच्या नोकरीला वर्षभर काही धोका नाही. शिक्षणाच्या क्षेत्राने जोडलेल्या विद्यार्थ्यांसाठी या कालावधीत खूप चांगले राहील. या कालावधीपासून डिसेंबर पर्यंतचा वेळ तुम्ही आपल्या धैयाकडे पोहचू शकता. लहान भाऊ बहिर्णीकडून प्रेम मिळण्यासोबतच मोठ्या भाऊ-बहीण आणि आई-वडिलांचा आशीर्वाद मिळेल. या कालावधीत तुमचे वडील व्यवसायात पैसा गुंतवणूक करतील. साप्ताहात मध्यात आरोग्यामध्ये कमतरता येऊ शकते. परंतु, शेवटी तुम्ही स्वतःला फीट फील कराल. **महिलांना-** समाजात तुमच्या मान सन्मानात वृद्धी होईल. या कालावधीत तुमच्या प्रवासयात्रा कमी होतील आणि तुम्ही आर्थिक रूपात उन्नत व्हाल. व्यापारात विस्तार होण्याने तुम्हाला उत्तम यशाची प्राप्ती होईल. घरात गोड बातमी मिळेल. आपल्याला भेटवस्तु मिळू शकते. **शुभदिनांक-** ३१,०१.

रखडलेले विवाह होण्याचा योग

कन्या : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात जर व्यस्त राहण्याची इच्छा ठेवत असतील तर या कालावधीत सुरवाती पासूनच संतुलित भोजन करा. खराब खाण्या-पिण्याने तुम्हाला आरोग्य संबंधित समस्या होऊ शकतात. या कालावधीत मध्यात तुम्हाला पित्त संबंधित शारीरिक समस्या होण्याची शक्यता आहे. या कालावधीत तुमचे प्रेमजीवन खूप चांगले राहील. रखडलेले विवाह होण्याचे योग आहेत. तुम्हाला जवळच्या मित्राकडून तुम्हाला धोका आहे. जर नोकरीची गोष्ट केली तर तुम्हाला बऱ्याच चढ-उतारांचा सामना करावा लागेल. बऱ्याच वेळा तुम्हाला आपली नोकरी दुविधेत पाहायला मिळेल. परंतु, सोबतच तुम्हाला नवीन ऑफर ही मिळतील. या कालावधीत आईच्या स्वास्थ्याच्या प्रति सावध राहा. **महिलांना-** कौटुंबिक जीवन ठीकठाक राहील. सासरच्या पक्षात कुणासोबतही वाद होण्याची शक्यता आहे. या कालावधीत काही समस्यांचा सामना करावा लागेल आणि तुम्हाला मिश्रित परिणामांची प्राप्ती होईल. यावेळी तुम्हाला आपल्या स्वास्थ्यावर विशेषरूपात लक्ष द्यावे लागेल. कारण, स्वास्थ्य संबंधित समस्या तुम्हाला त्रास देऊ शकते. **शुभदिनांक-**३०,२.

विदेशात नोकरीची संधी

तुळ : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात या राशीच्या जातकांसाठी सुरवात खूप चांगली राहील. यावेळी तुम्हाला विदेशात नोकरी करण्याची संधी चालून येईल. जाणे न जाणे तुमच्यावर राहील. आर्थिक स्थितीचा ग्राफ ही खूप चांगला राहील. या कालावधीच्या मध्यात तुम्ही नवीन घर किंवा ऑफिस खरेदी करू शकता. तथापि, नंतरचा वेळ थोडा निराशा जनक राहील. या काळात तुमची गाडी किंवा तुमची काही किंमती वस्तू हरवू शकते. मुलांच्या आरोग्याविषयी कुठल्याही प्रकारचा निष्काळजीपणा करू नका. कौटुंबिक स्थिती खराब होण्याच्या कारणाने तुम्ही घरात पूजा करवू शकता. विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी बरेच यश देणारे असेल. सरकारी नोकरीची तयारी करणाऱ्या विद्यार्थांना ही यावेळी अनुकूल परिणाम मिळतील. शेवटी आर्थिक स्थिती गडबडू शकते. या काळात तुम्हाला धन लाभासाठी अधिकात अधिक प्रयत्न करावे लागतील. ऑफिसच्या कामामुळे तुम्ही तणावाचे शिकार होऊ शकतात. **महिलांना-** यावेळी तुमचा बऱ्याच ठिकाणी प्रवास होतील. यामध्ये काही ठिकाणी तुम्हाला मनासारखे परिणाम मिळतील. तथापि, तुमची कमाई चांगली राहील. परंतु, अत्याधिक खर्चामुळे वित्तीय समस्या उत्पन्न होऊ शकतात. **शुभदिनांक-** २७,२९.

साथीदाराची बढती होईल

वृश्चिक : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात स्वास्थ्याच्या बाबतीत भाग्य तुमच्या सोबत राहील. पूर्ण आठवडा तुम्हाला उर्जावान वाटेल. या कालावधीत तुमचे प्रेम जीवन खूप चांगला राहण्याची शक्यता आहे. तसेच, तुमच्या प्रियकराची बढती होणार असून तुम्ही मात्र त्याच्याशी इमानदार राहाल. याकालावधीत तुमच्या पार्टनरला त्याच्या कार्यक्षेत्रात पदउन्नती मिळू शकते ज्यामुळे घरात आनंद येईल. तुमची मुले ही या कालावधीत अभ्यासात चांगले प्रदर्शन करतील. विद्यार्थ्यांना या कालावधीत चांगली संधी मिळण्याची शक्यता आहे. आर्थिक दृष्टीने ही तुम्हाला यावेळी लाभ मिळण्याची पूर्ण शक्यता आहे. या कालावधीमध्ये तुमचे मित्र ही बऱ्याच कामांमध्ये तुमची साथ निभावतील. या कालावधीत तुम्हाला अध्यात्माने जोडलेले अनेक चांगले अनुभव मिळतील. परदेशात जाण्याची लोकांची इच्छा या कालावधीत पूर्ण होऊ शकते. या कालावधीत तुमच्या नोकरीमध्ये स्थानांतरणाचे योग बनतील. **महिलांना-** तुमचे वर्तमान उत्तमरीत्या परिवर्तन होऊ शकते. वेळोवेळी आपल्या जवळच्या लोकांची काळजी घ्या आणि त्यांना गरज असल्यास मदत करा किंवा त्यांना काही भेटवस्तू द्या. म्हणजे नात्यामध्ये कुठल्या प्रकारचा तणाव येणार नाही. **शुभदिनांक-** १,२.

भागीदाराकडून धोका मिळण्याची शक्यता

धनु : एकूण ग्रहमान पाहता ही राशी स्वास्थ्याच्या दृष्टीने मजबूत असते. परंतु, या कालावधीत तुमचे स्वास्थ्य कमकुवत राहण्याची शक्यता आहे. पोट आणि मानसिक रोग तुम्हाला या कालावधीत खूप त्रास देईल. कुटुंबात या कालावधीत आरोप प्रत्यारोप होतील. यामुळे महिलामंडळ काही दिवसासाठी माहेरी जाईल. भागीदारीत व्यवसाय करणारे लोक अलर्ट व्हा. कारण भागीदाराकडून धोका मिळण्याची शक्यता आहे. वैवाहिक लोकांची सुरवात बरीच नाजूक राहील. यानंतर सर्व ठीक होऊन जाईल. तुमच्या संतानला जीवनात यश प्राप्तीसाठी अधिक परिश्रम करावे लागेल आणि यासाठी त्यावर बराच पैसा ही खर्च कराल. शिक्षणाच्या क्षेत्राने जोडलेले व्यक्ती या कालावधीत विदेशात जाऊ शकतात. या कालावधीत शेवटच्या दिवसांत तुमची आर्थिक स्थिती चांगली राहील. विद्यार्थांना या कालावधीत अधिक मेहनत करण्याची आवश्यकता आहे. **महिलांना-** तुमचे कौटुंबिक आयुष्य चढ उताराने भरलेले असेल. तसेच, दुसरीकडे दाम्पत्य जीवनात कभी खुशी कभी गम असे वातावरण असेल. आपल्या जीवनसाथी सोबत चांगले ताळमेळ बनवून ठेवा. तुम्ही आपल्या मुलांवर बराच खर्च कराल. **शुभदिनांक-** २९,३१.

परदेशात जाण्याची संधी

मकर : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात जातकांसाठी सुरवात चांगली राहील, परंतु मधला काळ थोडा कठीण राहील. सुरवातीला तुमचा पगार वाढू शकतो किंवा तुम्हाला परदेशात जाण्याची संधी मिळू शकते. आर्थिक स्थिती मधल्या काळात थोडी खराब होऊ शकते. परंतु, नंतर सर्व ठीक होईल. वैवाहिक लोकांचे जीवन चांगले राहील. जीवनसाथी सोबत तुम्ही चांगला वेळ घालवाल. जे लोक अविवाहित आहे त्यांचे या कालावधीत लग्न होण्याचे योग आहे. दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना यावेळी मनासारखे निकाल मिळतील आणि मनासारख्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळेल. तथापि आपल्या देशात जे शिक्षण प्राप्त करत आहेत त्यांची इच्छा परदेशात जाण्याची असेल तर ती पूर्ण होऊ शकते. प्रेम जीवनासाठी ही वेळ थोडी प्रतिकूल आहे. म्हणून परिस्थितीला ध्यानात घेऊन आचरण करा. **महिलांना-** तुमच्या कुटुंबात कुठल्यातरी गोष्टीला घेऊन ताणाताणी किंवा भांडण होऊ शकतात. तुमची कटू वाणी याचे सर्वात मोठे कारण बनेल.तुम्हाला वाटत असेल नाते टिकून राहावे तर, धैर्याने काम घ्या आणि आपल्या भाषेला मधुर करा. **शुभदिनांक-** २८,३०.

आर्थिक स्थिती आव्हानात्मक राहील

कुंभ : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात करिअरसाठी बरीच मेहनत करण्याची आवश्यकता असेल. सुरवातीमध्ये नोकरीला धोका होऊ शकतो. परंतु, नंतर स्थिती योग्य होईल. यावेळी कुटुंबातील सदस्यांसोबत तुमचा वाद होऊ शकतो. तथापि जीवनसाथी सोबत चांगला वेळ घालवाल. आर्थिक स्थिती आठवड्याच्या सुरवातीमध्ये थोडी आव्हानात्मक राहील, परंतु मध्यात पैसा येईल. तथापि तुमच्या जवळ पैश्यांची काहीच कमतरता नसेल, परंतु दुर्भाग्याची गोष्ट ही आहे की, तुमच्या हातात पैसा टिकत नाही. शिक्षणाच्या क्षेत्राने जोडलेल्या विद्यार्थ्यांना आठवड्याच्या मध्यात निराशा होऊ शकते. सरकारी नोकरीसाठी प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांना यावेळी चांगले गुण मिळतील. आरोग्याच्या दृष्टीने या राशीतील व्यक्ती स्वतःला खूप नशीबवान मानतील. दिर्घ आजारापासून मुक्ती मिळेल. **महिलांना-** दांपत्य जीवन बरेच मधुर राहील आणि तुमचे तुमच्या जीवनसाथी सोबत ताळमेळ चांगले असण्याने तुम्ही वैवाहिक जीवनाचा आनंद घ्याल. तथापि, तुम्हाला आपल्या जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. ज्यांना अपत्य नाही त्यांना या कालावधीत संतान प्राप्ती होऊ शकते. **शुभदिनांक-** २९,३०.

कौटुंबिक जीवन उत्तम राहील

मीन : एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात राशीच्या जातकाचे करिअर सुरवातीमध्ये बरेच चांगले राहील. नोकरीची नवीन संधी तुम्हाला मिळेल. नवीन प्रोजेक्टच्या बाबतीत तुम्ही आपल्या बॉससोबत विदेश यात्रेवर जाऊ शकता. पैश्याची कमी या आठवड्यात तुम्हाला अजिबात वाटणार नाही. कुटुंबात तुमचा मान वाढण्यासोबतच जबाबदारी ही वाढेल. तुमचे स्वास्थ्य उत्तम असेल. तुम्हाला जीवनात जोडलेल्या बऱ्याच गोष्टींवर मेहनत करावी लागेल. प्रेम जीवन अनुकूल राहील आणि जे लोक अविवाहित आहेत त्यांचे या कालावधीत लग्न होऊ शकते. मुलांकडून तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. कौटुंबिक जीवन बऱ्यापैकी चांगले राहील आणि तुम्हाला मान तसेच सन्मान प्राप्ती होईल. शेवटी आर्थिक स्थिती कमजोर राहील. **महिलांना-** ज्यांना मुले आहेत त्यांची प्रगती होईल. यावेळी तुम्हाला प्रॉपर्टीच्या संबंधित बरेच चांगले लाभ मिळू शकतात आणि तुमचे कौटुंबिक जीवन ही बऱ्यापैकी आरामात पूर्ण होईल. घरात नवीन सदस्याचे आगमन होऊ शकते. तुमच्या कामासाठी तुमचे कौतुक होईल. **शुभदिनांक-** २७,०२.

सोनम वांगचुक: लडाखी लोक का करत आहेत आंदोलन

संजय टाकळ गव्हाणकर

लडाखच्या जनतेच्या मूलभूत न्याय हक्कासाठी व पर्यावरणाच्या संरक्षणासाठी सोनम वांगचुक यांची लडाख ते दिल्ली ही १००० किलोमीटरची पदयात्रा दिल्लीच्या सीमेवर अडवण्यात येते आणि या शांतताप्रिय आंदोलन कर्त्यांना अटक करण्यात येते. त्यांना महात्मा गांधीच्या समाधीस्थळी उपोषण करण्यापासून परावर्त करण्यात आले. सध्या या आंदोलनकार्यांचे उपोषण लडाख भवन येथे सुरू आहे. लडाखचा प्रश्न हे आपणास तेथील जनतेच्या मूलभूत हक्क व तेथील पर्यावरण रक्षण त्याचबरोबर आंदोलनकर्त्यांची लडाख व त्या अर्थाने हिमालय बचाव अशी दुरदर्शी मागणी आहे . हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यात विकासाच्या नावावर जो पर्यावरणाशी खेळ केला गेला आणि विध्वंस पदरात पाडून घेतला याचा अनुभव असताना सामरिक व पर्यावरणाच्या अनुषंगाने अत्यंत संवेदनशील असलेल्या लडाख बाबत केंद्र सरकार जो नवीनखेळ करत आहे याचा दूरगामी दुष्परिणाम देशाला भोगावे लागतील. नेमका लडाखचा प्रश्न काय आहे आणि हिमालयाचे संकट काय आहे? या समस्येच्या अंतरात्म्याची आवाज घेऊन पर्यावरणवादी व विज्ञानवादी तथा ग्रीन टीचर सोनम वांगचुक हे दिल्ली दरबारी आले. सरकारने या संवेदनशील विषयाकडे संवेदनशील मनाने याची दखल घ्यायला पाहिजे व देशातील जनतेनेही या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे व हे आंदोलन देशव्यापी लोकचळवळ कशी होईल यासाठी प्रयत्न केले पाहिजे अन्यथा भारताच्या एकंदरीत भौगोलिक व पर्यावरणाच्या अनुषंगाने दीर्घदुष्परिणाम त्याच अनुषंगाने देशावर नैसर्गिक संपत्तीचे संकट ओढवणार आहे आणि या संकटामुळे देशातील अनेक पिढ्या ह्या गारद होणार आहेत.

लडाखचा प्रश्न काय आहे आणि तेथील पर्यावरणाचे काय महत्त्व व त्यामुळे हिमालयाचे भौगोलिक व पर्यावरणाच्या दृष्टीने देशासाठी काय महत्त्व आहे हे आपण जाणून घेऊया.

शालेय स्तरावरील अभ्यासक्रमामध्ये भारताचे भौगोलिक स्थान,भारतातील ऋतू व वातावरण, पर्यावरण यावर हिमालयाचे महत्त्व व स्थान लक्षणीय आहे अभ्यासले जाते . केवळ हिमालय पर्वतामुळेच भारतात पावसाळा, हिवाळा व उन्हाळा हे तीन ऋतू निर्माण होतात. जगातील एकमेव तीन ऋतू असणारा भारत हाच एकमेव देश आहे.

लडाख हा भाग किंवा त्याला आपण भूप्रदेश म्हणून तो भारताच्या उत्तरेतील हिमालय पर्वतरांगाच्या मध्ये बसलेला पठारीय थंड असं वाळवंट आहे. भारताच्या सामरिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच हा भूप्रदेश आहे. पाकिस्तान व सियाचीन सीमेला लागून असलेला या प्रदेशाचे क्षेत्रफळ ८६ हजार ९०४ किलोमीटर स्क्वेअर व सुमारे दोन लाख ७४ हजार २८९(२०११ च्या जनगणनेनुसार) लोकसंख्येचा हा भौगोलिक प्रदेश. भारतातील सर्वात मोठा व लोकसंख्येच्या दृष्टीने विरळ असलेला भारतातील दोन क्रमांकाचा हा भुप्रदेश आहे. येथील प्रत्येक गावा दरम्यानचे अंतर २० ते ८० किलोमीटर इतके यावरून येथील विरळ लोकसंख्या आपणास निदर्शनास येते. येथील पर्वतरांगा हिमालयापेक्षाही उंच आहेत आणि त्यामुळेच मध्य आशियातील थंड व कोरड्या वाऱ्यांपासून ते भारताला वाचवतात. येथील बहुसंख्य समुदाय हा ग्रामीण असून त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती व पशुपालन आहे. या भागात पाऊस अल्पशा प्रमाणात पडतो त्यामुळे हिमनद्या हेच पाण्याचा प्रमुख स्तोत्र आहे. लडाखमधील बहुसंख्य समुदाय हा आदिवासी जन जमातीचा असून त्यांची वेगळी सांस्कृतिक व पारंपारिक ओळख आहे. तिबेटियन संस्कृतीशी त्यांची नाळ जुळत असली तरी ते स्वतःला भारतीय मानतात. तिबेटियन समुदायांमध्ये बौद्ध, मुस्लिम व अल्प प्रमाणात हिंदू लोकांचा समावेश असुन त्यांची संस्कृती ही एकच आहे. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच या भागातील लोकांची स्वतंत्र लडाख स्वायत्त असावं अशी मागणी होती. स्वातंत्र्यानंतर जम्मू काश्मीर हा भारतामध्ये विलीन झाला. त्याबरोबरच लडाख या भागाचाही या जम्मू काश्मीर राज्यामध्ये समावेश झाला. जम्मू काश्मीरच्या विधानसभेमध्ये लडाख भागातील चार विधानसभा सदस्यांचा समावेश असुनही लडाख वासियांना नेहमी दुजाभावाची वागणूक दिल्या जाते अशी त्यांची भावना होती आणि त्यांनी वेळोवेळी स्वायत्त राज्याची मागणी लावून धरली होती.

२०१९ मध्ये जम्मू काश्मीर ३७० चे कलम रद्द केले आणि जम्मू काश्मीर व लडाख हे स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश अस्तित्वात आले. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे स्वागत लडाख येथील जनतेने केले. कारण त्यांना लडाख हे स्वतंत्र राज्य हवे होते. ३७० कलम रद्द झाल्यानंतर जम्मू-काश्मीर व लडाख हे स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश जरी झाले असले तरी फक्त केवळ जम्मू काश्मीर या केंद्रशासित प्रदेशातच विधिमंडळाचे अस्तित्व कायम ठेवले. परंतु लडाखच्या बाबतीत मात्र स्वतंत्र विधिमंडळ अस्तित्वात आले नाही. लडाख हा केंद्रशासित प्रदेश असल्याने उपराज्यपाल जे केंद्राने नियुक्त केलेले आहे त्यांच्यानुसार राज्याचा कारभार चालू आहे. त्यामध्ये लोकप्रतिनिधीचा कोणताच सहभाग नाही. केंद्र सरकारने दोन राज्याचे विभाजन करून केंद्रशासित प्रदेश अस्तित्वात आणले जम्मू-काश्मीरला एक न्याय व लडाखला दुसरा न्याय यामुळे २०१९ नंतर येथील जनतेमध्ये आपल्या अधिकाराच्या गळचेपीबद्दल असंतोष निर्माण झाला. आणि त्यांनी स्वायत्त राज्य व भारतीय राज्यघटनेतील सहाव्या सूची मध्ये लडाख चा समावेश करावा अशा मागणीला जोर धरला.

वास्तविक २०१९ च्या लोकसभा निवडणुकीम ध्ये भारतीय जनता पक्षाच्या जाहीरनाम्यात लडाखला घटनेच्या अनुसूची सहाव्या दर्जात समावेश करण्याचे आश्वासन नव्हे तर ग्वाही दिली होती. सन २०२० ला लडाख येतील ऍटोनॉमस हिल्स कॉन्सिलच्या निवडणुका झाल्या त्यावेळी प्रचाराच्या दरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पंधरा दिवसात लडाखला शेड्यूल सहा चा दर्जा देण्याचे आश्वासन दिले होते. केंद्रीय गृहमंत्र्याच्या आश्वासनास साद देऊन हिल कॉन्सिलच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांचा बहुमताने विजयी झाला. पंधरा दिवसात शेड्यूल सहा चा दर्जा देण्याचे आश्वासन नंतर वर्षभरही या बाबत कोणतीच कारवाई झाली नाही. आणि तिथूनच लडाखच्या जनतेमध्ये असंतोष निर्माण झाला आणि २०२१ आणि २२ व त्यानंतर मोठ्या प्रमाणात शांततेच्या मार्गानिलडाखच्याजनतेच्या मूलभूत अधिकार, लोकप्रशासनातील जनतेचा सहभाग व येथील पर्यावरण यावरून आंदोलने व उपोषणे झाली. या आंदोलनाचे नेतृत्व सोनम वांगछू यांच्याकडे आहे. त्यांच्या २१ दिवसाच्या बेमुदत आमरण उपोषणाने देशाचे नव्हे तर जगाचे लक्ष लडाख या प्रश्नाकडे वेधले आहे.

उद्योगपती मित्रांचे हितसंबंध जपण्यासाठी केंद्राचा घुमजाव आणि लडाखच्या लोकांचा असंतोष

पंधरा दिवसात लडाख ला घटनेच्या सहाव्या सूचीमध्ये समाविष्ट करतो असे आश्वासन गृहमंत्री देतात आणि तत्पूर्वी भारतीय जनता पार्टीच्या जाहीरनाम्यामध्ये समाविष्ट असताना एक वर्षाच्या कालखंडामध्ये या अनुषंगाने कोणतीच पावले उचलल्या जात नव्हती उलट त्याच्या विपरीत धोरणे आखल्या जात होते. ते म्हणजे २०१९ पूर्वी लडाख हा जम्मू-काश्मीर राज्याचा भाग होता त्यावेळेस या प्रदेशातील खनिज संपत्तीच्या उत्खननानाबाबत कोणताच निर्णय झाला नव्हता परंतु विद्यमान केंद्र सरकारने त्या दृष्टीने येथील नैसर्गिक संपत्ती व खनिज संपत्ती ही काही उद्योगपतींच्या घशात टाकण्यासंदर्भाची कारवाई सुरू केली होती. सौर ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून हजारो एकर या प्रदेशातील भागही खाजगी कंपन्यांना देण्याच्या अनुषंगाने कारवाई सुरू झाली होती. याच दरम्यान लडाखच्या सीमेवर चीनने घुसखोरी केली या घुसखोरीची माहिती ही सर्वप्रथम पशुपालन करणाऱ्या लडाख मधील समुदायाने समोर आणली परंतु याबाबत केंद्र सरकार चीनची घुसखोरी नाकारतो. लडाखमधील बहुसंख्य लोके ग्रामीण भागातील असून त्यांचा पशुपालन हाच व्यवसाय. चीनच्या घुसखोरीमुळे पशुपालन करणारा हा समुदाय आपल्या मेंढ्यांना व जनावरांना घरासाठी ज्या भागात घेऊन जात होता तो भाग चीनने बंद केला आणि दुसरीकडे केंद्र शासनाने वेगवेगळ्या प्रकल्पासाठी येथील हजारो एकर जमीन खाजगी कंपन्यांना देण्याचा करार केल्याने त्या जमिनीवरही या लडाखच्या पशुपालन करणाऱ्या समुदायास त्यांच्या चराई क्षेत्रात जाण्यापासून परावर्त केले. त्यामुळे त्यांचा जीवन आणि मरण्यांचा प्रश्न उभा राहिला. ३७० कलम हटवल्यानंतर एकाही लडाखच्या तरुणांना राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या सेवेमध्ये शासकीय नोकरी लागली नाही. एकंदरीत स्थानिक लडाखच्या लोकांच्या जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आणि त्यातूनच हे आंदोलन उभे राहिले.

केंद्र सरकारने लडाखला सहाव्या सूचीमध्ये समाविष्ट करण्याच्या आश्वासनावर घूमजावं यासाठी केला की, घटनेच्या सहाव्या सूचीनुसार ज्यावेळेस राज्याला दर्जा मिळतो त्यावेळेस स्थानिक लोकांच्या पारंपारिक कौन्सिलला असे अधिकार प्राप्त होतात की त्यांच्या परवानगीशिवाय तिथल्या नैसर्गिक संसाधन व खनिज संपत्तीला उत्खलनाची परवानगी देता येत नाही. परंतु केंद्रास त्यांच्या कॉपरेट मित्रांना या जमिनी व येथील खनिज संपत्ती द्यायची होती आणि त्यामध्ये सहावे शेड्युल ही अडथळा ठरत असल्याने केवळ आपल्या कॉपरेट मित्राच्या आर्थिक हितसंबंधाच्या अनुषंगाने पर्यावरण व देशाच्या सामरिक बाबीला तिलांजली दिली आणि २०२३ मध्ये संसदेत लडाखमधील खनिज संपत्तीच्या उत्खननाचा लिलावाचा ठराव पास करण्यात आला. केंद्र सरकारच्या या दुटप्पी धोरणामुळेच लडाखच्या जनतेने शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरू केले आहे. लडाख येथील सौर ऊर्जा प्रकल्पाने लडाख चे तापमान एक अंश सेल्सिअस पेक्षा जास्त वाढणार आहे त्यामुळे येथील पाण्याचा प्रश्न आणखीन गंभीर होणार आहे. याचबरोबर तेथील पर्यटन विकास या अनुषंगाने अनेक लक्झरिअस हॉटेल्स या ठिकाणी उभारण्यात येत असल्याने बोरवेल च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जमिनीतील पाण्याचा उपसा करण्यात येत असल्याने येथील पारंपारिक शेती करणाऱ्या समुदायांना शुष्क झालेल्या भुअंतर्गतजलसाठ्यांमुळे शेतीसाठी पाणीच मिळतनाही अशी परिस्थिती निर्माण झाली. रस्त्यानिर्मीती प्रकल्पाच्या अनुषंगानेही मोठ-मोठे पहाड खोदू नबोगदे बनवून येथील पर्यावरणाचा ऱ्हास करण्यात येत आहे. ही सर्व कंत्राटे फक्त भाजपाला ज्या कंपन्यांनी इलेक्ट्रॉल बॉण्डच्या माध्यमातून मदत केली अशा कंपन्यांना देण्यात आले हे विशेष!

केंद्र सरकारच्या या दुपटी धोरणाच्या मुळेच येथील जनतेचा असंतोषाचा उद्रेक झाला आहे तो शांततेच्या मार्गाने व्यक्त होत आहे. त्यांच्या फारशा काही मागण्या नाहीत. ते त्यांचा(भाजपाच्या व त्यांचे मित्राच्या) विकासाच्या पण विरोधात नाहीत परंतु त्यांना अपेक्षित आहे पर्यावरण पूरक विकास, स्थानिक तरुणांना रोजगार,त्यांची संस्कृती आणि त्यांच्या पर्यावरणाचं रक्षण करण्याचा अधिकार त्यांना मिळाला पाहिजे. म्हणून त्यांनी त्यांच्या चार मागण्या केंद्र शासनाकडे केल्या असून त्याचं लक्ष वेधण्यासाठी त्यांनी हा लॉन्ग मार्च केला आहे.

त्यांच्या मागण्या अशा आहेत.

१) लडाखला घटनेच्या सहाव्या शेड्युलमध्ये समाविष्ट करा.

२) लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा द्या.

३) लडाख मधून दोन खासदार लोकसभेसाठी पाठवा लेह आणि कारगिल.

४) लडाखच्या युवकांना रोजगारांच्या हमीसाठी कमिशनची स्थापना करा.

ह्या त्यांच्या माफक मागण्या आहेत. लडाख हा पूर्वी जम्मू काश्मीर राज्याचा भाग होता त्यावेळेस येथील खनिज संपत्ती व नैसर्गिक साधनसंपत्ती यावर कधीही कोणी अतिक्रम केलेले नाही. लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये कमी अधिक प्रमाणात का होईना येथील जनतेला शासन कारभारामध्ये काम करण्याचा अधिकार होता. परंतु ३७० कलम हटवल्या नंतर विद्यमान केंद्र शासनमात्र लडाख हा जणू काही आपल्या भारताचा भागच नाही अशा पद्धतीने कार्य करीत आहे. सोनम वांगचूं यांचे हे आंदोलन लडाखच्या पर्यावरण व जनतेच्या अधिकाराच्या अनुषंगाने जरी असले तरी ते संपूर्ण हिमालयाच्या संरक्षणासाठी कसे आहे आणि जर केंद्र सरकारने यासंदर्भात उचित पावले उचलली नाही तर याचा दूरगामी दुष्परिणाम भारतीय जीवन व्यवस्थेवर होणार आहे याविषयी त्यांनी केंद्र शासनास सुचवले आहे. **

लग्नसंस्कृतीचा... 'घटस्फोट' होताना!!

धनंजय शेटये

आजच्या आधुनिक काळात पावलोपावली नातेसंबंधात संघर्ष निर्माण होताना दिसत आहे.जन्माने मिळालेले नातेसंबंध बदलता येत नसतात पण तिथेही संघर्ष काही कमी नाही.पूर्वी एकत्रकुटुंब पद्धतीमध्ये अधिकार आणि जबाबदारीची विभागणी केली जात असे पण त्यातही एखादा घटक सक्षम नसेल तरी त्या घटकाला कौटुंबिक ऐक्याचे सहभावनेचे सहकार्य लाभत होते. त्यामुळे प्रत्येक नात्यात आपलेपणा होता,काळजी होती. पण नंतर अहंकार, अधिकार, जबाबदारीचा व्यवहारिक हिस्सा, जबाबदारी टाळणे, आपापसातील आपपरभाव या सारख्या प्रश्नांमुळे हळूहळू अंतर्गत कौटुंबिक कलह निर्माण होऊ लागले.

लग्न या धार्मिक विधीमुळे केवळ दोन व्यक्ती,दोन मनेच नाहीतर दोन कुटुंबे, कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र येऊ लागले.त्यामुळे लग्न या संकल्पनेचं अनन्यसाधारण महत्त्व निर्माण झाले. दोन कुटुंबे, दोन संस्कृती, परंपरा, सामाजिक बांधिलकीने लग्न या धार्मिकविधीचं एक सर्वमान्य स्थान निर्माण झाले.

'लग्नाच्या गाठी या स्वर्गात बांधल्या जातात' म्हणजे आपला जोडीदार हा पूर्व पुण्याईने, नशिबाने मिळत असतो असे मानू लागले.

'गाठविवाह' हा हिंदू धर्मातील सोळा संस्कारांपैकी पंधरावा संस्कार आहे. ज्यामुळे विवाहाची इच्छा असणारे उपवर स्त्री आणि पुरुष ब्राह्मण, नातेवाईक आणि अग्नी यांचा साक्षीने पती पत्नी म्हणून संबंध होतात त्या संस्काराला 'विवाह' असे म्हणतात. पाणिग्रहण संस्कारास सामान्यतः हिंदू लग्न या नावाने ओळखले जाते. अन्य काही धर्मांत विवाह हा विशेष परिस्थितीत तोडला जाऊ शकणारा पती व पत्नी यांमधील एका प्रकाराचा करार असतो. परंतु हिंदू विवाहामुळे जुळून आलेला पति-पत्नींदरम्यानचा तथाकथित जन्मोजन्मींचा संबंध हा सामान्य परिस्थितीत तोडला जाऊ न शकणारा संबंध असतो. अग्नीभोवती चार प्रदक्षिणा घालून व ध्रुव ताऱ्यास साक्षी ठेवून दोन शरीरे, मने आणि आत्मे एका पवित्र बंधनात बांधले जातात. हिंदू विवाहात पतिपत्नींमधल्या शारीरिक संबंधांच्या जोडीने आत्मिक संबंधांनाही महत्त्वाचे व अत्यंत पवित्र मानले गेले आहे. हिंदू समजुतींनुसार मानवी जीवनास (ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, संन्यासाश्रम व वानप्रस्थाश्रम) या चार आश्रमांत विभागले गेले आहे. त्यांतील गृहस्थाश्रमासाठी पाणिग्रहण, संस्कार विवाह हा अत्यावश्यक आहे. हिंदू विवाहानंतर पतिपत्नींमध्ये घडून येणारा शारीरिक संबंध फक्त वंशवृद्धीच्या उद्देशानेच व्हावा अशी आदर्श कल्पना आहे. विवाह संस्कार हा मनुष्याच्या जीवनातील एक महत्त्वाचा संस्कार! असे या विधीचे काव्यात्म वर्णन केले आहे. विवाहाला पाणिग्रहण, उपयम, परिणय, उद्वाह अशीही नावे आहेत. पाणिग्रहण, म्हणजे वराने वधूचा पत्नी होण्यासाठी हात आपल्या हाती घेणे. 'उपयम' म्हणजे वधूच्या जवळ जाणे किंवा तिचा स्वीकार करणे. 'परिणय' म्हणजे वधूचा हात हाती घेऊन अग्नीला प्रदक्षिणा घालणे. उद्वाह म्हणजे वधूला पित्याच्या घरून आपल्या घरी नेणे. मानवी समाजातील ही सर्वात प्राचीन संस्था मानली जाते. विवाह ही केवळ कुटुंबातील महत्त्वाची घटना नसून तिचे समाजाच्या दृष्टीनेही विशेष महत्त्व आहे. धर्मसंपत्ती आणि प्रजासंपत्ती असे विवाहाचे दोन उद्देश मानले जातात. साताजन्माचे सोबती म्हणून मनाचा करार करु पाहणारी दांपत्य आज एकमेकांचा एवढा तिरस्कार का करीत आहेत? एकमेकांचे तोंडही पाहत नाहीत अशी परिस्थिती का निर्माण व्हावी?

मग आजच्या आधुनिक युगात लग्न संकल्पना कमकुवत का बनत चालली आहे? परंपरागत रितीरिवाज कालबाह्य ठरत आहेत का?

'घटस्फोट' 'काडीमोड' 'सोडचिठ्ठी' अशा अनेक शब्दांच्या नावावर लग्न संबंध संपुष्टात आणले जातात. मुळात अशी परिस्थिती का निर्माण होते? अगदी प्रेमविवाह असो अन्यथा अॅरेंज मैरेज असो कुठेतरी अहंकार,'मी'पणा सामंजस्य यांना तडा गेलेला असतो. पतीपत्नी छोट्या मोठ्या गोष्टींवरून क्षुल्लक कारणावरून एकमेकांसोबत सातत्याने भांडण करत असतात. त्यात करुन आजचे चित्रपट, टिव्हीमालिका आणि चित्रपट यातील कथानके, टिव्ही सिरियलच्या कलावंतांच्या वैयक्तिक जीवनातील गोष्टींच अनुकरण आजकाल प्रचंड प्रमाणात होत असते.

जवळजवळ नव्वद टक्के कलावंतचे घटस्फोट झालेले असतात. नामांकित सिने अभिनेते, अभिनेत्री यांचे झालेले घटस्फोट पाहुन सामान्य माणूस क्षुल्लक कारणावरून झालेल्या कौटुंबिक कलहांचे पडसाद घटस्फोटच्या दिशेने वाटचाल घेऊन जाताना दिसत असतो. पूर्वी समाजाचा आरसा चित्रपट, मालिका मध्ये दाखवला जायचा. आज हे रुप उलट झालेले आहे. घटस्फोट म्हणजे वैध वैवाहिक संबंध कायदेशीररित्या तोडणे. घटस्फोट घेण्यापूर्वी दोन्ही पक्षांमध्ये सर्व मुद्द्यांवर संमती असणे आवश्यक आहे.

घटस्फोट घेण्यासाठी कोर्टाकडे जावे लागते. कोर्ट दोन्ही पक्षांची बाजू ऐकून घटस्फोटाचा निर्णय घेतो. घटस्फोटाच्या निर्णयानंतर कोर्ट हुकुमनामा जाहीर करतो. घटस्फोटाच्या वेळी मुलाबाळांचा ताबा आणि संपत्ती यावरूनही मोठ्या समस्या निर्माण होत असतात.

थोडक्यात काय तर काही काही ठिकाणी आज परंपरागत वैवाहिक जीवनावरचा विश्वास काही प्रमाणात कमी होत चालला आहे. वैवाहिक बंधनं नकोशी वाटू लागली आहेत.

'लिव्ह इन रिलेशनशिप' चं नवं फॅड अतिशय घातक आहे. 'लग्न' संस्कृती सामाजिक नैतिकता सांभाळून होती. पण आज 'मनोमिलन' 'कौटुंबिक मिलन' आपल्या ऋणानुबंधांच्या माणसांसाठी आपलेपणा जपणारी ही लग्न परंपरा इतकी बोथट का होत आहे? आज समाजात घटस्फोटांचे प्रमाण एवढे वाढत का आहे? नक्की कोण जबाबदार आहे हे परिस्थितीला! विचार करण्यासारखी गोष्ट आहे. लग्न परंपरेची पडझड वेळीच थांबविली नाही तर पुढील पीढी संस्कृतीहीन होईल. नातेसंबंध टिकणार नाहीत. जनावरे आणि आपण यात फारसा फरक उरणार नाही. **

देव आहे की नाही

निलेश साठे

देवाचं अस्तित्व मान्य करणाऱ्यांपेक्षा देवाचं अस्तित्व नाकारणाऱ्यांची संख्या सध्या जास्त वाढत चालली आहे. नक्की देव आहे की नाही हे मान्य कसं करायचं. देवाचं अस्तित्व मान्य करणारे मला बाप आहे म्हणजे माझी निर्मिती कोणामुळे तरी झाली आहे म्हणजेच कोणीतरी निर्माता आहे म्हणजेच देव आहेअसे सर्वसाधारण कारण सांगतात. परंतु देवाचं अस्तित्व नाकारणारे याला निसर्गचक्र म्हणतात. निसर्ग हा तयार झालेला आहे त्यातूनच उत्पत्तीआणि विनाश हा होतच राहणार. आणि हे अखंड चालत राहणार. देव किंवा ईश्वर असं काही नाही. असे मानतात. पण मग जर असे असेल तर काही घटना या अशा काही घडतात जेणेकरून देवाचं अस्तित्व आपल्याला मान्य करावेच लागते. लाखो लोक असे आहेत ज्यांनी नवस करून आपले इच्छित देवाकडून मागून घेतलेले आहे आणि देवानं सुद्धा त्यांचं गाऱ्हाणं ऐकलेलं आहे. परंतु कोरोडो लोकं असे सुद्धा आहेत जे वर्षानुवर्ष देवाकडे नवस करत आहेत परंतु देवानं त्यांचं गाऱ्हाणं ऐकलं नाही. त्यांना ते मिळालेले नाही किंवा देवाने दिलेलं नाही. अशा प्रसंगात तुझ्या नशिबात नाही असे सांत्वन केले जाते. मग सत्य काय समजायचं देव आहे की नाही.

जेव्हा एखाद्या कठीण प्रसंगातुन आपला बचाव होतो म्हणजे एखाद्या जीव घेणे प्रसंगात कोणीतरी आपला जीव वाचवतो आपल्याला काही इजा होऊ देत नाही आपले नुकसान टाळतो मग ज्या एखाद्यामुळे आपला जीव वाचला किंवा त्याच्यामुळे आपली काही हानी झाली नाही तर त्याला आपण देवदूतच समजतो. वेळप्रसंगी जो आपल्या मदतीसाठी धावून आला त्याला आपण देवच मानतो. देवानेच त्याला आपल्या मदतीला धाडले असेल अशी आपली ठाम समजूत होते. पण मग जेव्हा एखाद्या ठिकाणी चोरी दरोडा खून बलात्कार अत्याचार घडतो त्यावेळी तिथे मदतीसाठी कोणीही नसते अशा प्रसंगात देव कुठे असतो असा प्रश्न निर्माण होतो. लहान लहान मुलांवर अत्याचार केले जातात. अगदी मंदिर परिसरात सुद्धा बलात्कारासारख्या घटना घडलेल्या आहेत. पण तिथे देवाने कोणत्याही प्रकारे मदत केलेली नाही. मग देवाचं अस्तित्व का मान्य करावे. असेही काही जण प्रश्न विचारतात. पण इथे ती तुमच्या कर्मांची फळे आहेत असा युक्तिवाद केला जातो. मागच्या जन्मात तुम्ही काहीतरी पाप केलं आहे त्याची परतफेड ही या जन्मामध्ये केली जात आहे असाही युक्तिवाद केला जातो. बरं त्या लहान मुलांनी काय बरे पाप केले असेल. आणि मग ही कर्माचे फळ भोगण्यासाठी मनुष्य जन्मच का. असे म्हणतात की ८४ लक्ष योनी फिरल्यानंतर माणसाचा जन्म भेटला आहे. मग शिक्षा भोगण्यासाठी माणसाचा जन्म झाला आहे का. तर पापातून मुक्त होण्यासाठी माणसाचा जन्म भेटला आहे असे काही जाणकार सांगतात. मनुष्याच्या जन्माला आलाच आहे तर काहीतरी चांगले कृत्य करा. आणि पाप पुण्याच्या या दुष्चक्रातून बाहेर पडा. असे काही सल्ले दिले जातात. माणूस चंद्रावर सुद्धा जाऊन आला पण तिथेही देव भेटला नाही मग देव आहे तरी कुठे. या प्रश्नावर देवाला इकडे तिकडे कुठेही शोधू नका तो तुमच्या आमच्यातच आहे असेही उत्तरे ऐकायला मिळतात. देवाचं अस्तित्व मान्य करा अथवा नका करू परंतु अशा काही घटना आपल्या देशामध्ये घडलेल्या आहेत जेणेकरून देवाचं अस्तित्व आपल्याला मान्य करावेच लागते.

आता हेच पहा काश्मीरमधील अमरनाथ मंदिरामध्ये बर्फाचे शिवलिंग आपोआप बनते. मग ते शिवलिंगच का दुसरे का काही नाही बनत. तामिळनाडू मधील रामेश्वर धाम मध्ये समुद्रात कधीच वादळ येत नाही असे का बरे. हिमाचल प्रदेश मधील माता ज्वालादेवी मंदिरातील ज्योत विना इंधन जळत आहे. याशिवाय पुरी ओडिसा येथील जगन्नाथाच्या मंदिरावरून एकही पक्षी अथवा विमान जाऊ शकत नाही. चित्तोडगढ मधील बांण माता मंदिरातील त्रिशूल आरतीच्या वेळी आपोआप हलते. यावरून काय समजायचे. अगदी हल्ली हल्ली चे उदाहरण बघायचे झाले तर केदारनाथ येथे भयंकर पावसाने महा जलप्रलय आला होता या जलप्रलयात सुद्धा मंदिराला काहीच धक्का लागला नाही. उलट डोंगरावरून एक मोठा शीला वाहत वाहत येऊन मंदिराच्या अगदी समोर आडवा होऊन स्थीरावला ज्यामुळे वरून येणारे पाणी दोन भागांमध्ये विभागले आणि मंदिर शाबूत राहिले. ती शीला आजही आपल्याला पाहायला मिळते. हे असे का घडले यावर कोणत्या शास्त्रज्ञा कडेही उत्तर नाही. मग हे सर्व कशामुळे घडत आहे. देव पृथ्वीवर आहे म्हणूनच ना. पण मग जेव्हा माणसे हतबल असतात जिथे अन्याय अत्याचार घडतो तिथे देव एखादा अवतार का घेत नाही हा प्रश्न अनुत्तरीत राहतो.

मग देव आहे की नाही या प्रश्नाचा सारासार विचार करता. हे सर्व आपल्या मानण्यावर आहे. मानला तर देव आहे. नाही मानला तर देव नाही. याच निष्कर्षावर येऊन पोहोचावे लागते. **

स्कॉलरशिप परीक्षा : गणिती सूत्रे, क्लुप्त्या व युक्त्या

लसावी मसावी



आकडेमोड
राजेंद्र पाटील
९८२२३०२०८५

शिष्यवृत्ती परीक्षेत संख्या देऊन त्यांचा लसावी मसावी काढण्यासाठी प्रश्न दिले जातात. आपल्या विद्यार्थ्यांचा या उदाहरणांचा सराव उत्तम असेल, तर विद्यार्थी ही उदाहरणे व्यवस्थित सोडवितात. गणित असा एक विषय आहे की, त्यामध्ये सरावाला अनन्यसाधारण महत्व आहे. लसावी मसावी ची उदाहरणे सोडवताना सुध्दा तितकेच सरावाला महत्व आहे. त्याच बरोबर त्यातील नियम सूत्रे तितकीच महत्वाची आहेत. कारण लसावी मसावी काढताना विद्यार्थी हमखास गोंधळतात, त्यामुळे दोन्ही उदाहरणांची उत्तरे काढण्यासाठी सूत्रे महत्वाची भूमिका बजावतात.त्यासाठी या उदाहरणांच्या पायापर्यंतजाऊन माहिती देणे आवश्यक असते. जसे की. विभाजक, सामाईक विभाजक, विभाज्य, पध्दती सूत्रे व्याख्या यांची योग्यपध्दतीने माहिती सराव करून घेतल्यास विद्यार्थ्यांची उदाहरणे चुकणार नाहीत. व त्यांचा आत्मविश्वास वाढेल. त्यांच्या गुणांची वाढ होण्यास मदत होईल.

ल.सा.वि.
ल= लघुत्तम Least (L)
सा= सामाईक Common (C)
वि= विभाज्यच ultiple (M)
म.सा.वि.
म= महत्तम Highest (H)
सा= सामाईक Common (C)
वि= विभाजक Factor (F)
ल.सा.वि.

व्याख्या- दिलेल्या दोन किंवा अधिक संख्येने ज्या लहानात लहान संख्येला भाग जातो त्या संख्येला ल. सा.वि. असे म्हणतात. उदा. ३ व ४ ने १२ ला पूर्ण भाग जातो. म्हणून१२ हा ३ व ४ चा ल.सा.वि. आहे.

सामाईक विभाज्य - जेव्हा एकाच संख्येने ज्या लहानात लहान वेगवेगळ्या संख्यांना पूर्ण भाग जात असेल तेव्हा ती संख्या त्या संख्येची सामाईक विभाजक असते.

उदा. ४व८ ने १२ ला पूर्ण भाग जातो. म्हणून ४ हा ८ व १२ चा सामाईक विभाजक आहे.

विभाज्य:- एखाद्या संख्येने ज्या ज्या संख्यांना पूर्णभाग जातो त्या त्या सर्व संख्या दिलेल्या संख्येचे विभाज्य (multiple) आहेत असे म्हणतात.

जसे ६ च्या विभाज्य संख्या ६,१२,१८,२४

टिप:-

१. विभाज्य संख्या या दिलेल्या संख्येच्या पटीमध्ये किंवा त्या पाढ्यांमध्ये असतात.

२. विभाज्य संख्या अनेक असतात.

३. कमीतकमी दोन संख्यांना त्या एकाच संख्येने भाग जातो.

४. ल.सा.वि.ला उदाहरणातील सर्व संख्येने पूर्ण भाग जात असतो.

५. ल.सा.वि हा उदाहरणातदिलेल्या सर्वात मोठ्या संख्येएवढा किंवा लहानात लहान ज्या संख्येचा उदाहरणातील सर्व संख्येला पूर्ण भाग जात असतो तेवढा लसावि असतो.

ल.सा.वि. काढण्याच्या पध्दती

१) यादी पध्दती ५ व ६ चा ल.सा.वि. काढा

५ चे सर्व विभाजक
५,१०,१५,२०,२५,३०,३५,४०,४५

६ चे सर्व विभाजक
६,१२,१८,२४,३०,३६,४२,४८

५ व ६ च्या विभाजाकांपैकी लहानात लहान विभाज्य ३० आहे.

५ व ६ चा ल.सा.वि.= ३०

२) मूळ अवयव पध्दत १२ व ८ चा ल.सा.वि. काढा.

१२चे मूळ अवयव २x२x३
८ चे मूळ अवयव २x२x2
दोघांत सामाईक अवयव = २x२
उरलेले अवयव = ३, २
सर्वांचा गुणाकार = २x२x३x२ = २४

३) समाईक मूळ अवयव पध्दती

र) दोन मूळ/ सहमूळ संख्यांचा ल.सा.वि. हा त्यांच्या गुणाकारा इतकाच असतो.

उदा. ९ व ११ चा ल.सा.वि. = ९x११ = ९९
५ व ८ चा लसावि = ५x ८ = ४०

ल) दोन संख्यापैकी एक संख्या दुसऱ्याचा विभाज्य असेल तरती विभाज्य संख्या त्याचा ल.सा.वि. असते.

उदा- २४ व ७२ यांचा ल.सा.वि.= ७२

ल) अपूर्णांकांचा ल.सा.वि. चे सूत्र=

अपूर्णांकांचा ल.सा.वि. = अंशातील संख्यांच्या लसावि
छेदातील संख्यांचा मसावी
म.सा.वि.

व्याख्या:-म.सा.वि. म्हणजे अशी मोठ्यात मोठी संख्या की ज्या संख्येने दिलेल्या सर्व संख्यांना भाग जातो.

उदा १२ व १६ या दोन्ही संख्येला ४ ने पूर्ण भाग जातो. ४ हा १२ व १६ चा म.सा.वि. आहे.

विभाजक:- एखाद्या संख्येला ज्या ज्या संख्यांनी भाग जातो त्या सर्व संख्यांना मुळच्या संख्येच्या विभाजक संख्या किंवा दिलेल्या संख्येचे विभाजक असे म्हणतात.

१ हा सर्वच संख्यांचा सामाईक विभाजक असल्यामुळे त्याचा विचार करण्याची गरज नसते.

म.सा.वि. काढण्याच्या पध्दती

१) यादी पध्दत - १२ व १८ चा म.सा.वि. काढा

१२ चे म.सा.वि. १ २ ३ ४ [६] १२
१८ चे म.सा.वि. १ २ ३ [६] ९ १८
या सामाईक विभाजकांमध्ये मोठा विभाजक= ६
१२ व १८ चा म.सा.वि. = ६

२) मूळ अवयव पध्दती २० व ३० चा म.सा.वि. काढा.

२०चे अवयव = २ x २x[५]
३०चे अवयव = २x ३x[५]
सामाईक अवयवांचा गुणाकार = २x५ = १०

३) भागाकार पध्दती- १२ व २० चा मसावी काढा

१२ या लहान संख्येत २० या मोठ्या संख्येस भाग दिल्यानंतर जि बाकी ८ येत असेल त्यास भाग द्यावा 0 येईपर्यंत भाग चालू ठेवा. जेव्हा बाकी शून्य येईल त्यावेळच्या भाजक संख्या ४ हा त्या दोन संख्यांचा मसावि असतो.

भागाकार पध्दती

१२) २०(१)
- १२
८

८) १२(१)
-८
४

४) ४(१)
-४
0

यातील भाजक संख्या ४ ही या वरील दोन संख्यांचा मसावी असतो.

सरावासाठी उदाहरणे

१)६२४✻१६ या संख्येला ७२ ने निःशेष भाग जाण्यासाठी ✻ च्या जागी पुढील पैकी कोणता अंक असेल

(१) ४ (२) ३(३) ८ (४) ६

२)२ ते १० पर्यंत च्या कोणत्याही संख्येने भागले असता बाकी १ उरेल अशी लहानात लहान संख्या कोणती (१) २५२१ (२) १०००० (३) ५०५४ (४) ५५००

✻✻

दमदार कवितांचा धगदार दस्तऐवज

अक्षरवेल!

डी. बी. जगत्पुरिया

कविता ही आपल्या देशातच नव्हे तर जगात प्रिय असलेली विधा आहे. आशयघन कविता मनाला टवटवीत ठेवायचं काम करते. शंकर घोरसे नावाच्या अष्टपैलू प्रतिभावंताने अतोनात परिश्रम घेऊन 'अक्षरवेल' नावाचा दर्जेदार, संग्राह्य प्रातिनिधिक कविता संग्रह संपादित केला आहे. साहित्यिक, कवी, चिंतक, अभिनेता, दिग्दर्शक व विमर्शक असलेल्या प्रतिभेची ही कृती संग्राह्य नि् अजोड अशी आहे. 'ज्ञानपथ' प्रकाशनची ही देखणी, आशयघन काव्यसंपदा मराठी काव्य दालनाचा गौरव गुणित करणारी आहे.

रवीन्द्र शोभणे, विठ्ठल वाघ, बबन सराडकर, वसंत वाहोकार, लोकनाथ यशवंत या मुरब्बी हस्ताक्षरांनी संग्रहाची शान वाढवली आहे. या संग्रहात अर्जुमन बानोसारखी मायमातीची आराधना करीत अन्नदात्यासाठी समृद्धीचं वैभव मागणारी कलंदर कवयित्री भेटते. 'मोल घामाचं' या कवितेत शेतकरीच्या पतीचं अफाट दुःख कवेत घेणारा कवी खुशाल गुल्हाने भेटतो!

'शहिदाची आई' मधील-

''देशासाठी बलिदान
देऊनि गेलं लेकरू
भारत मातेचे माझ्या
हाल हाल नका करु !'

या ओळी सैनिकांवर प्रश्न विचारणाऱ्या लबाड राजकारण्यांना अनावृत्त करतात. डॉ. एकनाथ पांडवे -

''झेंड्यानीच आता
फडकण्याचे थांबवायला हवं
ऐक्याचे टोक मिळेपर्यंत....''

या अर्थसघन ओळी दलित, सामाजिक चळवळींच्या स्वार्थी विघटनवादी वृत्तीवर प्रहार करतात.

''कोणता माणूस आहे आत माझ्या
मी म्हणूनच जात नाही आत माझ्या
जा, जरी म्हटले तरीही जात नाही
भूक आहे केवढी धाकात माझ्या''

अजीजखान पठाण यांनी गझलेला चढवलेला सामाजिक गणवेष पाहून ख्यातकीर्त गझलकार बशीर बद्र यांची आठवण होते. कुणाला मातीचा लळा तर कुणाला ओली सांज आठवते. विविध आशयाच्या, विविध रूपाकाराच्या, विविध आशयाच्या कवितांनी नटलेली ही अक्षरवेल मन मोहून टाकते! सजग वाचक, आस्वादकांच्या मनात ही कवितांची टवटवीत अक्षरवेल रोपण्यात परिश्रमी संपादक यशस्वी आले आहेत.

कविता कवीचे कर्म असते. जडतेला तोडणारा सृजनात्मक प्रयत्न असते कविता! मी प्रचंड गाजलेल्या 'ठिणगी' कविता संग्रहात म्हटलं होतं -

कविता:
''दर्पणाचा पारा
खळाळती धारा
चैतन्याचा वारा असते!''

कविता:
''ममतेचा पंख
गर्जनेचा शंख
बंडाचा डंख असते !''

ठिणगी. पृष्ठ.....३

'गोधडी' कवितेतून आजीची लाख मोलाची आठवण जागते. 'बाबासाहेब' ही कविता त्यांचं अफाट व्यक्तित्तत्व पुढे ठेवते. 'सौंदर्यवती' या कवितेतून सौंदर्याच्या मधाळ ओळी टपकतात.

''श्रावणधारा बरसू लागल्या सजली
ही धरणी
शृंगाराचा साज लेऊनी जणू भासे
नवतरुणी !''

एखाद्या कवयित्रीला वात्सल्य पाझरत ठेवणाऱ्या मायचा पदर मोठा वाटतो तेव्हा त्या माऊलीची कूस धन्य होते.

''माय तुझा पदर म्हणजे
शिखर गाठण्याचे पंख
मनगटातील लक्ष्यबळ
वाजवितो विजयी शंख''

कवयित्रीच्या प्रतिभेतून साकारलेल्या अशा ओळी सार्थकी लागतात. रक्तदानाचं, विद्यादानाचं, बाईपणची, समजदार व्हायची शिकवण देणाऱ्या कविताही या कृतीत भेटतात, त्यामुळेच शंकररावांनी भरवलेलं हे भरगच्च 'कवी-संमेलन' लाजबाब झालंय. प्रा. मीनल येवले सातत्याने लेखन करणाऱ्या प्राध्यापिका आहेत. त्यांची 'बाई आणि माती' ही कविता सृजनाचा संदेश देत मोठा आशय सांगणारी सकस कविता आहे.

''माझ्या कवितेने जावं, रोज फिरण्या रानात
अन् तिनं सांगावं गुपित, वाऱ्याच्या कानात''

ही कविता राब-राब राबणाऱ्या पोशिंद्याला वाहिलेला मानाचा मुजराच आहे. काही स्वनाम धन्य तुच्छतावादी समीक्षक नवोदितांच्या कविता न वाचता टीका करतात.

एक महा तुच्छतावादी तर या कवितांना रद्दीछाप म्हणाला होता.

''फासा भिजून गेल्या वखरून वावराले
पाझर अजूक नाई आला तरी ढगाले''
''माझा बळीराजा झाला आज बळीचा बकरा
निसर्गासहित साऱ्यांनी केला त्याचा कचरा''
''असे मराठी माय आपुली
आब राख तू शिवबापरी
जिजाऊसम तिची अस्मिता
निशाण फडकव गगनावरी''

अशा दमदार प्रतिभांचं स्वागत का होऊ नये? ''आजचा कवी, वैज्ञानिक चेतनेचा कवी आहे. त्याची दृष्टी विश्वाच्या संपूर्ण क्रियाशीलतेचं अध्ययन करीत आहे!'' असं एका चिंतकाने म्हटलंय.

या कविता संग्रहात विविध आशयाच्या कविता आहेत. एका कवीने चन्द्रावर जाणाऱ्या चान्द्रयानाचा संदर्भ दिलाय. अन्नदात्याची वेदना अक्षरबद्ध करणाऱ्या बऱ्याच कविता आहेत. व्यसनावरच्या कवितेत एक कवी म्हणतो-

''नाई फिकर रायली तुले मानसा देहाची
रोज लागते ढोसाया दारू गावठी मोहाची !''

व्यसनाचा भेसूर परिणाम कवीने अचूक टिपला आहे. पंढरी कवितेतील संपादक शंकरराव घोरसे यांच्या चिंतनगर्भ ओळी मननीय आहेत. ते म्हणतात -

''पुढारले किती । विज्ञानाचे भक्त ।
प्रयोगाने रक्त। निघेच ना ।।
सज्जनाच्या आता । मनातील पाप
एक्सरेचा बाप । दाखवे ना ।।

या धाडसी निर्भय कवीने विज्ञानाच्या मर्यादा दाखवून दिल्या आहेत. कार्यकारी संपादक प्रभाकर तांडेकर यांचंही अभिनंदन. त्याची पाठराखण आणि हटके तडित वृत्तातील गझल अल्पाक्षरी प्रतिभेचे उत्तम उदाहरण आहे. एका लेखात सर्वच एकशे एक कवींचा नामोल्लेख करता येणं शक्य नाही. या सर्व प्रतिभांकडून सकस काव्य निर्मिती होत राहो ही शुभेच्छा!

प्रा. डॉ. शोभा रोकडे यांनी प्रस्तावना खूपच जीव ओतून लिहिली आहे. त्या विशाल मनाच्या विमर्शक आहेत. सर्व अंगांनी सरस उतरलेल्या या कृतीची वाङ्मयीन संस्थांनी नोंद घेऊन या प्रयताला पुरस्कृत करायला हवे. ''शब्द सुवासिक व्हायचे असतील तर लेखकाच्या हृदयाची भूमी सहानुभूतीने भिजली पाहिजे!'' असं थोर समीक्षक निर्मलकुमार फडकुले म्हणाले होते. अशा कवींच्या प्रतिभेचं दर्शन संपादकांनी घडवलंय. ज्ञानपथ पब्लिकेशनचे सचिन सकलकर यांनी संग्राह्य दस्तऐवज दिला. त्यांचेही अभिनंदन ! विविध ऊर्जावान उपक्रम राबवणाऱ्या अक्षरक्रांती फाऊंडेशनला शुभेच्छा! ✻✻

दिवाळीनंतर निवडणूक, मतदारांची करमणूक!

निवडणुकीमध्ये आदर्श आचारसंहितेचा कितीही बागुलबुवा उभा केला जात असला, तरी मतदारांना लुभावणारी अनेक आश्वासने दिली जातात. मतदानाच्या दिवशी तर प्रत्येक मतदारसंघात पैशाचा महापूर येतो. मद्य आणि अन्य अनेक भेटवस्तूंचीही रेलचेल असते. एरव्हीच्या निवडणुकीपेक्षा दिवाळीच्या काळात येणारी निवडणूक मतदारांची अधिक चंगळ करते. महाराष्ट्रातील ताजी निवडणूकही त्याला अपवाद नाही.

प्रा. अशोक ढगे

निवडणूक आयोगाने आणि सर्वोच्च न्यायालयाने आदर्श आचारसंहितेची कितीही अपेक्षा केली असली आणि रेवडी संस्कृतीला आळा घालण्याची कितीही भाषा केली, तरी प्रत्यक्षात निवडणूक आचारसंहितेची 'ऐसी की तैसी' होत असते. निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या खर्चात निवडणूक लढवून ती जिंकणारा अपवादात्मकच म्हणावा लागेल. निवडणूक जाहीर होण्याच्या अगोदरपासून मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवारांना कोट्यवधी रुपयांचा खर्च करावा लागतो. निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या खर्चाची मर्यादा विचारात घेतल्यास हा खर्च किती तरी जास्त असतो. अतिशय चुरशीच्या लढती असणाऱ्या मतदारसंघात विजयासाठी एक एक मत महत्त्वाचे असते. त्यामुळे उमेदवाराचे कार्यकर्ते मतदानाच्या काही दिवस अगोदरपासूनच आपल्या विधानसभा मतदारसंघातल्या पण बाहेरगावी रहात असलेल्या मतदारांना निवडणुकीसाठी आणायचे नियोजन करत असतात. त्यासाठी लागणारी वाहन व्यवस्था आणि प्रवासादरम्यान त्यांच्या भोजन व अन्य व्यवस्थाही उमेदवाराच्या खर्चातूनच केली जात असते, हे आता उघड सत्य आहे.

विशेषतः विविध कामांनिमित्त उत्तर महाराष्ट्रातून गुजरातमध्ये गेलेल्या आणि तिथेच स्थायिक झालेल्या मतदारांना आणण्याची जशी व्यवस्था करावी लागते, तशीच व्यवस्था कोल्हापूर, सांगली, सोलापूर जिल्ह्यातून कर्नाटक, आंध्र, तेलंगणा आदी राज्यात वेगवेगळ्या व्यवसाय किंवा कामानिमित्त गेलेल्या मतदारांना आणण्यासाठी करावी लागते. त्याचबरोबर मराठवाडा विदर्भ आणि नगर या भागामधून पुण्यात रोजगारानिमित्त स्थायिक असलेल्या मतदारांना आपापल्या मतदारसंघामध्ये नेण्याची व्यवस्था करणे हे एक कुशल निवडणूक व्यवस्थापन असते. काही मतदारसंघातील विजयासाठी उमेदवारांना नवी मुंबई आणि मुंबईमध्ये जाऊन सभा घ्यावी लागते आणि मतदार मंडळींना आणण्याची व्यवस्थाही करावी लागते. कल्याण परिसरातही जामखेड, नेवासे, पाथर्डी, शेवगाव आदी भागातून मोठ्या प्रमाणात लोक कामानिमित्त स्थायिक झालेले असतात; परंतु त्यांची नावे संबंधित विधानसभा मतदारसंघात तशीच असतात. त्यांनाही आणण्याची व्यवस्था करावी लागते.

निवडणुकीच्या काळात दिवाळी आली तर या काळात मतदारांना काय काय देऊ, कुठे ठेवू असे उमेदवारांना होऊन जाते. पूर्वीच्या काळी तरी सुशिक्षित आणि उच्चभ्रू वर्ग उमेदवारांकडून मतदानाच्या काळात पैशाची अपेक्षा करत नव्हता; परंतु अलीकडच्या काळात मतदानाचा 'दर' मोठ्या प्रमाणात वाढल्याने आता हे पैसे सोडायचे तरी कशासाठी, अशी मतदारांची मानसिकता झाली आहे. लोकशाही व्यवस्थेसाठी हे चांगले नसले, तरी आता सर्वच उमेदवार आणि राजकीय पक्ष मतदारांना लुभावणाऱ्या अनेक गोष्टी करतात. कोणताही प्रतिस्पर्धी उमेदवार अशा पध्दतींना विरोध केला आणि मतदारांना आपल्यामुळे काही मिळाले नाही, तर त्याची नाराजी होऊन आपल्याला फटका बसायचा, या मानसिकतेतून मौन बाळगणे पसंत करतो. उलट, जाहीर समारंभांमधून विरोधकांचे पैसे घ्या, मद्य घ्या; परंतु मतदान आम्हाला करा, असे राजरोसपणे सांगितले जात आहे. अशाच प्रकारच्या शरद पवार यांच्या वक्तव्यामुळे उच्च न्यायालयाने शरद पवार यांच्यावर ताशेरे ओढताना यशवंतराव गडाख यांची लोकसभेवरील निवड रद्द केली होती; परंतु आता अशी तक्रार करण्याचे धाडस कुणीच करत नाही. त्याचे कारण आता सर्वांचे पाय चिखलाने माखले आहेत. निवडणूक जाहीर झाल्याच्या अगोदरपासूनच मेजवान्या, प्रचाराबद्दल मिळणारा रोज आणि भेटवस्तू यामुळे कार्यकर्त्यांची आणि मतदारांची चंगळ होत आहे.

अलीकडच्या काळात गृहनिर्माण संस्था उमेदवारांकडून इमारतींना रंग लावून घेण्यापासून अनेक कामे करून घेतात. ही एक प्रकारची लाच असते; परंतु लाच देणारा आणि घेणाराही गुन्हेगार असतो, याचे भानच आता कुणाला राहिलेले नाही.

दिवाळीच्या काळात निवडणूक आली की आकाश कंदील, पणत्या, सजावट साहित्य, फटाके, फ्लेक्स बोर्ड आदी प्रकारांना महत्त्व येते. दहा-अकरा लोक एकत्र येऊन एक संघटना स्थापन करतात आणि उमेदवारांकडून त्या बदल्यात वेगवेगळ्या वस्तू लाटतात, असे प्रकारही आढळून येतात. भजनी मंडळांना वेगवेगळे साहित्य दिले जाते. महिला बचत गटांना वेगवेगळी आमिषे दिली जातात. वेगवेगळे साहित्य भेट दिले जाते असे अनेक प्रकार आता निवडणुकीच्या काळात होत आहेत. दिवाळीमुळे घरोघर पॅकेज देण्याची स्पर्धा लागली आहे. त्यात अभ्यंगस्नानाच्या पॅकेजमध्ये सुगंधी तेल, उटणे, साबण, पणत्या, रांगोळी, आकाशकंदील, अत्तर आणि फटाके आदी गोष्टींचा समावेश असतो. महिला बचत गटांशी संपर्क साधून त्यांच्या याद्या घेऊन संख्येनुसार महिलांना साड्या किंवा अन्य गोष्टींचे वाटप केले जात असते. निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात प्रत्येक मत आपल्यालाच मिळावे, यासाठी उमेदवार व्यूहरचना करत असतात. त्यासाठी उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते प्रभागनिहाय मतदार यादी घेऊनच बसतात. आपल्या हक्काची मते कोणती, विरोधकांची मते कोणती, विरोधकांच्या मतांपैकी कोणती मते आपल्याला मिळू शकतात, हे समजून घेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली जाते.

निवडणुकीच्या काळातच देवदर्शनाची टूम निघते. वाऱ्या वाढतात. देवदर्शनाची व्यवस्था अप्रत्यक्षरीत्या उमेदवारच करत असतो. फक्त त्याचे नाव कुठेही पुढे येऊ दिले जात नाही. मतदान मात्र त्यालाचळेल, याची तजवीज केली जात असते. निवडणुकीच्या काळात गृहपयोगी वस्तू आणि पैसेवाटपाचे प्रकार छुप्या पद्धतीने सुरू आहेत. साड्यावाटपाचा प्रकार तर आता प्रत्येक ठिकाणी होत आहे. साड्या वाटताना अनेक ठिकाणी चेंगराचेंगरी झाल्याची उदाहरणे कमी नाहीत. आता मतदारांना भेट देण्याचा आणखी एक नवीन प्रकार उघडकीस आला आहे. मतदारांना दिवाळीसाठीचे पॅकेज आणि खरेदीसाठीचे गिफ्ट व्हाउचर पाठवले जात आहे. दिवाळी हा समृद्धीचा सण असला, तरी त्यातून राजकीय सुबत्ता साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मतदारांना आकर्षित करणे हा यामागचा हेतू आहे. खुलेआम साड्या आणि मिठाईचे वाटप सुरू झाले आहे. साड्यांच्या दुकानात होत असलेली उलाढाल हे त्याचेच लक्षण आहे. एरवी दिवाळी, लग्नसराई आणि अन्य उत्सवकाळात साड्यांची खरेदी वाढत असते; परंतु निवडणुकीच्या काळात ही खरेदी अधिक होत आहे. आचारसंहिता लागू असतानाही भेटवस्तू, साड्या, मिठाई, कपडे आदी खरेदी करण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याला दिवाळी भेट असे गोंडस नाव दिले जाते.

काही महिन्यांपूर्वी नाशिक शिक्षक मतदारसंघातील निवडणूक अतिशय गाजली. या निवडणुकीमध्ये मतदारांना पैठण्या आणि दागिने वाटल्याची खुले आम चर्चा झाली. केवळ चर्चाच झाली नाही, तर साड्या आणि दागिने वाटणाऱ्या काहीजणांना ताब्यात घेण्यात आले; परंतु कोणीही तक्रार करण्याच्या भानगडीत पडले नाही. उलट परस्परांचे कार्यकर्ते कसे सुटतील, याचीच व्यवस्था करण्यात आली. आता अलीकडच्या काळात तर महिलांना जशा साड्या दिल्या जातात, तसे पुरुष मतदारांनाही शर्ट- पँट देण्याकडे कल वाढला आहे. दिवाळीच्या निमित्ताने कुणामार्फत तरी भेटवस्तू देणे हे उमेदवारांना अधिक सुरक्षित वाटायला लागले आहे. याशिवाय सहकारी गृहनिर्माण संस्था, वसाहती आणि विविध उत्सव साजरे करण्यासाठी वेगवेगळ्या जातीधर्माची मंडळे अशा सर्वच घटकांना या ना त्या कारणाने खूश करावे लागते. त्यासाठी प्रलोभन दाखवण्याचे वेगवेगळे प्रकार पुढे आले आहेत. एखाद्या धार्मिक स्थळी सभामंडप उभारून देणे, कमान उभारून देणे यासाठी खर्च केला जातो.

पूर्वी लोक कशाचीही अपेक्षा न करता गावातील प्रमुख व्यक्ती सांगेल त्याला मतदान करत; परंतु आता तशी परिस्थिती राहिली नाही. आता मतदारांना मॅनेज करणारे ठेकेदार तयार झाले आहेत. उमेदवार त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून मोकळे होतात. निवडणूक आता सोपी राहिलेली नाही. विधानसभेच्या निवडणुकीच्या खर्चाची मर्यादा काही लाख असली तरी प्रत्यक्षात प्रभागाची निवडणूकही आता कोटी खर्चल्याशिवाय होत नाही. त्यामुळे विधानसभेची निवडणूक किती खर्चिक झाली असेल याचा विचार न केलेलाच बरा. काही ठिकाणी निवडणूक अतिशय चुरशीची असेल तर मतदारांना मोबाईलसारख्या वस्तूही वाटल्या जातात. निवडणूक जितकी छोटी, तितका खर्च अधिक असे समीकरण आता तयार झाले आहे. राजस्थान विधानसभेच्या निवडणुकीमध्ये मतदारांना मोफत मोबाईल देण्याची घोषणा करण्यात आली होती. तेलंगणामध्ये तर २२० कोटी रुपयांच्या साड्यांचे वाटप करण्यात आले होते. तमिळनाडू सरकारने मतदारांना दीड कोटींपेक्षा अधिक टीव्ही वाटले. मध्य प्रदेश सरकारने तर आणखी कहर केला. तिथे निवडणुकीअगोदर आदिवासी आणि तेंदुपत्ता गोळा करणाऱ्यांना बूट, चपला, साड्या आणि पाण्याच्या बाटल्या वाटल्या गेल्या. छत्तीसगडमध्येही ५५ लाख लोकांना स्मार्टफोन वाटण्यात आले. त्यातल्या त्यात असे गैरप्रकार करणाऱ्या राज्यांमध्ये केरळ सर्वात खाली आहे. सर्वाधिक गैरप्रकार करणाऱ्या आणि मतदारांना विकत घेणाऱ्या राज्यांमध्ये गोवा हे राज्य देशात पहिल्या क्रमांकावर येते. 'द इलेक्ट्रॉन इंटिग्रिटी प्रोजेक्ट' या संस्थेने नऊ राज्यातील निवडणुकांचा अभ्यास करून केलेला अहवाल डोळ्यांमध्ये झणझणीत अंजन घालणरा आहे. ✻✻

बॉर्डर गावस्कर करंडक स्पर्धा २०२४

ऑस्ट्रेलियाविरूद्ध भारतीय संघ जाहीर

। नवी दिल्ली । वृत्तसंस्थ ।

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या बॉर्डर गावस्कर करंडक स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा केली आहे. २२ नोव्हेंबर ते ७ जानेवारी दरम्यान भारतीय संघ रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियाविरूद्ध ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. यामध्ये वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहकडे भारतीय संघाचे उपकर्णधारपद सोपवण्यात आले आहे.

मागच्या काही काळापासून दुखापतीमुळे चर्चेत असलेल्या मोहम्मद शमीला संघात स्थान देण्यात आलेले नाही. याचबरोबर न्युझीलंडविरूद्धच्या मालिकेत भारतीय संघाचा भाग असणाऱ्या कुलदीप यादवलाही संघातून वगळण्यात आले आहे. तसेच, नुकतेच बांगलादेशविरुद्धच्या टी-२० मालिकेत भारताकडून पदार्पण करणाऱ्या नितीश कुमार रेड्डीची बॉर्डर गावसकर ट्रॉफीसाठी निवड झाली आहे. यावेळी गोलंदाज हर्षित राणाला देखील संधी देण्यात आली आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी भारतीय संघात पर्यायी सलामी फलंदाज म्हणून अभिमन्यू ईश्वरनला संधी देण्यात आली आहे.

भारतीय संघ- रोहित शर्मा (कर्णधार), जसप्रीत बुमराह (उपकर्णधार), यशस्वी जयस्वाल, अभिमन्यू ईश्वरन, शुबमन गिल, विराट कोहली, केएल राहुल, रिषभ पंत (यष्टीरक्षक), सरफराज खान, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, मोहम्मद सिराज, आकाश दीप, प्रसिद्ध कृष्णा, हर्षित राणा, नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर.

मालिकेचे वेळापत्रक

पहिली कसोटी : २२-२६ नोव्हेंबर, पर्थ
दुसरी कसोटी : ६-१० डिसेंबर, ॲडलेड (दिवस-रात्र कसोटी)
तिसरी कसोटी : १४-१८ डिसेंबर, ब्रिस्बेन
चौथी कसोटी : २६-३० डिसेंबर, मेलबर्न
पाचवी कसोटी : ३-७ जानेवारी, सिडनी

कुलदीप ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी अनुपलब्ध

कुलदीपने बेंगळुरू येथील न्युझीलंडविरूद्धचा पहिला कसोटी सामना खेळला होता. पण भारताला त्या सामन्यात आठ विकेट्सने पराभव पत्करावा लागला होता. पुण्यातील दुसऱ्या कसोटी सामन्यात कुलदीपच्या जागी वॉशिंग्टन सुंदरला संघात संधी देण्यात आली. यावेळी बासीसीआयने निवेदनात स्पष्ट केले की, कुलदीपला संघातून वगळणे हा रणनीतीचा भाग नसून त्याला दुखापतीमुळे विश्रांती देण्यात आली आहे. कुलदीप यादव ऑस्ट्रेलिया दौऱ्याच्या निवडीसाठी अनुपलब्ध होता. कारण त्याला न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात मांडीच्या समस्येला सामोरे जावे लागले होते.

शमीची देखील निवड नाही

मोहम्मद शमी घोट्याच्या शस्त्रक्रियेतून सावरण्याचा प्रयत्न करत आहे. मोहम्मद शमीच्या दुखापतीत सुधारणा होऊनही निवड समितीने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी त्याची निवड केलेली नाही. या मालिकेपूर्वी कर्णधार रोहित शर्माने शमीच्या दुखापतीबाबत अपडेट देताना सांगितले होते की, टाचेच्या दुखापतीतून सावरलेल्या शमीच्या गुडघ्याला सूज आली होती, यामुळे तो नव्या मालिकेत भारतीय संघाचा भाग होऊ शकत नाही. गुडघ्याला सूज आल्याने शमीला बॉर्डर-गावस्कर करंडक स्पर्धेतही स्थान मिळू शकले नाही, असा अंदाज वर्तवला जात आहे.

भारताचे अफगाणांसमोर लोटांगण

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

इमर्जिंग आशिया चषक टी-२० स्पर्धेतील उपांत्य फेरीच्या सामन्यात अफगाणिस्तानने भारताचा दणदणीत पराभव केला आहे. अफगाणिस्तानने भारताला २०७ धावांचे लक्ष्य दिले होते. पण, अफगाणिस्तानच्या गोलंदाजीसमोर भारतीय फलंदाजांनी शरणागती पत्करली. सर्व सामने जिंकून उपांत्य फेरी गाठलेल्या भारताला अफगाणिस्तान समोर पराभवाचा सामना करावा लागला आणि अफगाणिस्तानने अंतिम फेरीत प्रवेश केला.

अफगाणिस्तानचे सलामिवीर सेदीकुल्लाह अटल व झुबाईद अकबरी यांनी भारतीय गोलंदाजांना हैरान करून सोडले होते. १२ व्या षटकात अफगाणिस्तानने १०० धावा पुर्ण केल्या. १४ व्या षटकात भारताला पहिला बळी घेण्यात यश आले. सेदीकुल्लाह अटल व झुबाईद अकबरीने पहिल्या विकेटसाठी १३७ धावांची मोठी भागीदारी केली. यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या प्रत्येक फलंदाजाने त्याच आक्रमकतेने फलंदाजी सुरू ठेवली आणि भारताला २०७ धावांचे आव्हान दिले.

भारतीय फलंदाजांनीही आक्रमक भूमीका घेतली. परंतु, सलामीवीर अभिषेक शर्मा ७ धावांवर बाद झाला. मागोमाग प्रभसीमरन सिंगच्या (१९) रुपाने दुसरा धक्का मिळाला. ६व्या षटकात अब्दुल रहमानने कर्णधार तिलक वर्माला (१६) माघारी पाठवले. १०व्या षटकात नेहल वधेराने सलग १ चौकार व २ षटकार ठोकले. पण शेवटच्या चेंडूवर धावचीत झाला. यानंतर रमणदीप सिंगने अर्धशतकीय खेळीने भारताला विजयाच्या दिशेने घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. पण त्याला यश आले नाही. यामुळे अफगाणिस्तानने भारताचे ६ फलंदाज बाद करत १८६ धावांवर रोखले.

भारताच्या टी-२० संघाची घोषणा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारत विरूद्ध न्यूझीलंड संघात ३ सामन्यांची कसोटी मालिका खेळली जात आहे. यानंतर भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेविरूद्ध ४ सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. यासाठी भारतीय नियामक मंडळाने भारतीय संघाची घोषणा केली आहे. पण या मालिकेत शिवम दुबे, मयंक यादव या खेळाडूंना संधी मिळाली नाही.

बांगलादेशविरूद्धच्या टी-२० मालिकेत ४० चेंडूत शतक झळकावणाऱ्या संजू सॅमसनने सध्या टी-२० संघात आपले स्थान राखून ठेवले आहे. तर, प्रतिभावान खेळाडू नितीश कुमार रेड्डीला टी-२० संघात स्थान मिळाले नसून ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या बॉर्डर गावसकर ट्रॉफीसाठी संघात स्थान मिळाले आहे.

भारतीय संघः- सूर्यकुमार यादव (कर्णधार), संजू सॅमसन, अभिषेक शर्मा, रिंकू सिंह, तिलक वर्मा, जितेश शर्मा, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, रमणदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, अर्शदीप सिंग, विजय कुमार, अवेश खान, यश दयाल.

भारत विरूद्ध दक्षिण आफ्रिका संघातील ४ सामन्यांच्या टी-२० मालिकेला ८ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. पहिला सामना ८ नोव्हेंबरला डर्बनमध्ये तर दुसरा सामना १० नोव्हेंबरला होणार आहे. तिसरा आणि चौथा टी -२० सामना अनुक्रमे १३ आणि १५ नोव्हेंबरला होणार आहे.

धोनी आयपीएल खेळणार

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

इंडियन प्रीमियर लीग २०२५ हंगामाआधी होणारा लिलाव येत्या काही दिवसात पार पडणार आहे. त्याआधी ३१ ऑक्टोबरपर्यंत संघांना आपल्या संघात कोणत्या खेळाडूंना रिटेन करणार हे घोषित करायचे आहे. यामुळे सध्या चेन्नई सुपर किंग्सचा माजी कर्णधार एमएस धोनीला रिटेन करणार की नाही, याची चर्चा आहे.

४३ वर्षीय धोनीने अद्याप आयपीएलमधून निवृत्ती घेतलेली नाही. अशात आता धोनीनेच एका कार्यक्रमादरम्यान त्याच्या खेळण्याबाबत भाष्य केले आहे. धोनीने तो कदाचित आगामी हंगामात खेळू शकतो, असे संकेत दिले आहेत.

एका प्रमोशनल कार्यक्रमात बोलताना धोनी म्हणाला की, मी जितकं क्रिकेट खेळू शकतो, त्या काही शेवटच्या वर्षांचा मला आनंद घ्यायचा आहे.

रायगडचा खो-खो संघ जाहीर

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य ५०व्या कुमार-कुमारीगट अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेसाठी रायगडचे संघ जाहीर करण्यात आला आहेत. ही स्पर्धा धाराशिव येथील जल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था येथे २७ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत खेळली जाणार आहे. रायगड जिल्ह्याच्या संघ निवडीकरिता जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा २० ऑक्टोबर रोजी पनवेल येथील जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्राच्या आयोजनाखाली आयोजित करण्यात आली होती.

मुलांचा संघः- जय घाडगे, गौरव टेंबे, भावेश गोविलकर, ध्रुव मोकल, दिपेंद्र पाटील, सुजल मोकल, हिमेश म्हात्रे, साई थळे, पियुष पाटील, सर्वेश गायकर, ओमकार सावंत, सिद्धार्थ पडवळ, मासूम मुजावर, विघ्नेश पाटील, प्रतीक जाधव. राखीव- सुमित गजने, विकी जोशी, विवेक म्हात्रे. प्रशिक्षक- लावण्य मगर. व्यवस्थापक- अक्षय मोरे.

मुलींचा संघः- वैष्णवी थोरात, संजीवनी जगदाळे, श्रेया पोळ, प्रज्ञा गाडे, दिक्षा पाटील, साक्षी शेट्टी, लावण्या म्हात्रे, अनया अरसूल, तृप्ती टेंबे, उपासना शिगवण, सायली टेंबे, ज्ञानेश्वरी कुपाडे, प्रतीक्षा तालीकोटे, निधी गावंड, सौम्या केणी. राखीव- निहारिका मुंढे, श्रीया भगत, श्रावणी कचरे. प्रशिक्षक- समीर म्हात्रे. व्यवस्थापीका- मीनाक्षी म्हसकर.

मेघालयाची जोरदार फटकेबाजी

। औरंगाबाद । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र वि. मेघालया रणजी ट्रॉफी स्पर्धेतील तिसऱ्या फेरीच्या सामन्याला शनिवारपासून सुरूवात झाली. प्रथम फलंदाजी करणाऱ्या मेघालयाने महाराष्ट्राविरूद्ध जोरदार फटकेबाजी करत पहिल्या दिवसाअंती ८ गडी गमावून २७४ धावा केल्या. यामध्ये बालचंदर अनिरुद्ध शतकी खेळी करून १४० धावांवर नाबाद आहे. मेघालयाचा सलामीवर बामनभा शांगपलियांग आक्रमक फलंदाजी करत होता, तर दुसऱ्या बाजूने अर्पित भाटेवाला संथ खेळी खेळत होता. पुढे अजय दुहान व बालचंदर अनिरुद्धने सान्यात गती पकडली. दोघांची शतकी भागीदारी केली. मेघालयाचा डाव एका बाजूने घसरायला सुरूवात झाली तेव्हा दुसऱ्या बाजूने बालचंदर धावा करत राहीला आणि पहिल्या दिवशी मेघालयाला २७४ धावांचा टप्पा गाठून देण्यात योगदान दिले.

सुर्यांशचे थोडक्यात शतक हुकले

। त्रिपुरा । वृत्तसंस्था ।

मुंबई संघ रणजी ट्रॉफी स्पर्धेतील तिसरा सामना त्रिपुराविरूद्ध खेळत आहे. त्रिपुराविरूद्धच्या सामन्यात मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. मुंबई पहिल्या दिवसात चांगली कामगीरी केली आणि दिवसाअंती २४८ धावांचा टप्पा गाठला. यामध्ये सुर्यांश शेडगेचे शतक अवघ्या एका धावेने हुकले आहे.

दरम्यान, मागच्या सामन्यात दीडशतकी खेळी करणारा आयुष म्हात्रे दुसऱ्या षटकात ४ धावा करून परतला. त्यामागोमाग सिध्दांत अधटरावही (५) तंबुत परतला. पुढे २४ व्या षटकात अंग्रीश रघुवंशी (२८) पायचीत झाला, तर ३० व्या षटकात कर्णधार अजिंक्य रहाणे (३५) धावबाद झाला. ८७ वर ४ बाद अशी मुंबईची अवस्था असताना सिद्धेश लाड व सुर्यांश शेडगेच्या जोडीने सामन्यात लय पकडली. दोघांनी ७० धावांची भागिदारी केली. यानंतर सिद्धेश लाड (२९) झेलबाद झाला.

यानंतर सुर्यांशने शम्स मुलानीला साथीला घेतले आणि पुन्हा भागीदारी उभारली. मुंबईची धावसंख्या २०० पार घेऊन जाण्यात या जोडीला यश आले. पण, सुर्यांश शेडगेचे शतक पुर्ण होण्यासाठी एका धावेची गरज असताना त्याला झेलबाद होऊन माघारी परतावे लागले. त्याने १० चौकार व ४ षटकारांच्या मदतीने ९३ चेंडूत ९९ धावांचे योगदान दिले. सध्या शम्स मुलानी ३८ व हिंमाशु सिंग ५ धावांवर नाबाद आहेत आणि मुंबईने दिवसाअखेरीस ६ विकेट्स गमावत २४८ धावांचा टप्पा गाठला आहे.

पाकिस्तानचा तीन वर्षांनी मायदेशात विजय

। रावलपिंडी । वृत्तसंस्था ।

पाकिस्तान संघाने इंग्लंडविरुद्ध पहिला कसोटी सामना पराभूत झाल्यानंतर अफलातून पुनरागमन करत पुढील दोन्ही सामने जिंकले आणि मालिकाही २-१ अशा फरकाने जिंकली आहे. रावळपिंडी येथे झालेल्या तिसऱ्या कसोटीत पाकिस्तानने तिसऱ्याच दिवशी ९ गडी राखून विजय मिळवला आहे.

पाकिस्तान संघाने तीन पैकी दोन सामन्यात इंग्लंडला पराभूत करून मालिका जिंकली. यावेळी पाकिस्तानने तब्बल तीन वर्षांनी मायदेशात हा मालिका विजय साजरा केला आहे.

दरम्यान, पाकिस्तानने २०२१ नंतर पहिल्यांदाच मायदेशात कसोटी मालिका जिंकली आहे. यावेळी इंग्लंडला पाकिस्तानसमोर अवघे ३६ धावांचेच लक्ष्य ठेवता आले होते. हे लक्ष्य पाकिस्तानने ३.१ षटकात एक गडी गमावत पूर्ण केले. कर्णधार शान मसूदने आक्रमक खेळत ६ चेंडूत नाबाद २३ धावा केल्या. तसेच, सईम आयुबने ८ धावा, तर अब्दुल्ला शफिकने ५ धावा केल्या.

या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर इंग्लंडने पहिल्या डावात ६८.२ षटकात सर्वबाद २६७ धावा केल्या. इंग्लंडकडून जॅमी स्मिथने सर्वाधिक ८९ धावा केल्या, तर बेन डकेटने ५२ धावांची खेळी केली. पाकिस्तानकडून या डावात साजिद खानने ६ बळी घेतले होते. तसेच, नोमन अलीने ३ बळी, तर झाहिद महमुदने १ बळी घेतला. यानंतर पाकिस्तानकडून सौद शकिलने १३४ धावांची शतकी खेळी केली. पण नंतर फलंदाजी कोलमडली होती. परंतु, नोमन अली आणि साजिद खान यांनी नंतर केलेल्या खेळीमुळे पाकिस्तानने ३४४ धावा केल्या आणि ७७ धावांची आघाडी घेतली. इंग्लंडकडून रेहान अहमदने ४ बळी घेतले, तर शोएब बाशीरने ३ बळी घेतले. गस ऍटकिन्सनने २ आणि जॅक लीचने १ बळी घेतला.

यानंतर इंग्लंडचा दुसरा डाव तिसऱ्या दिवशी फक्त ११२ धावांवर उरकला. इंग्लंडकडून जो रुटने सर्वाधिक ३३ धावा केल्या, तर हॅरी ब्रुकने २६ धावा केल्या. या दोघांशिवाय कोणालाही २० धावाही पार करता आल्या नाहीत. पाकिस्तानकडून नोमन अलीने ६ बळी घेतले, तर साजिद खानने ४ बळी घेतले.

दरम्यान, इंग्लंड ११२ धावांवर सर्वबाद झाल्याने त्यांना पाकिस्तानसमोर ३६ धावांचेच लक्ष्य ठेवता आले.

भारताचे अव्वल स्थान धोक्यात

। पुणे । प्रतिनिधी ।

भारतीय संघाला न्यूझीलंड विरुद्ध दुसऱ्या कसोटी सामन्यात शनिवारी (दि.२६) ११३ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. दरम्यान, ही मालिका जागतीक कसोटी अजिंक्यपद २०२३-२५ स्पर्धेचाही भाग आहे, यामुळे या सामन्याच्या निकालाचा परिणाम स्पर्धेच्या गुणतालीकेवर झाला आहे. सध्या भारतीय संघ सलग दुसऱ्या पराभवानंतरही अव्वल क्रमांकावर कायम आहे. मात्र, आता भारताच्या आणि दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या ऑस्ट्रेलियाच्या विजयी टक्केवारीमध्ये अवघ्या काही गुणांचा फरक राहिला आहे. यामुळे भारताचा आता हा अव्वल क्रमांकही धोक्यात आला आहे. भारतीय संघ आता ६२.८२ विजयी टक्केवारीसह अव्वल क्रमांकावर आहे. भारताने १३ सामन्यांपैकी ८ विजय आणि ४ पराभव स्वीकारले आहे आणि १ अनिर्णित सामना राहिला आहे. तसेच ऑस्ट्रेलियाची ६२.५० विजयी टक्कवारी असून ते दुसऱ्या क्रमांकावर आहेत. तिसऱ्या क्रमांकावर श्रीलंका असून त्यांची ५५.५६ विजयी टक्केवारी आहे. तसेच आता न्यूझीलंड भारतावरील सलग दुसऱ्या विजयामुळे चौथ्या क्रमांकावर पोहचले आहेत. त्यांनी दक्षिण आफ्रिकेला मागे टाकले आहे. न्यूझीलंडची आता ५०.०० विजयी टक्केवारी झाली आहे.

बारा वर्षानंतर भारतीय संघ मायदेशात पराभूत

न्यूझीलंड संघाने रचला इतिहास

। पुणे । प्रतिनिधी ।

न्यूझीलंड क्रिकेट संघाने शनिवारी (दि.२६) पुण्याच्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर इतिहास रचला आहे. न्यूझीलंडचा हा भारतातील पहिलाच कसोटी मालिका विजय आहे. यापूर्वी त्यांना भारतात कधीही कसोटी मालिका जिंकता आली नव्हती. तसेच, त्यांनी भारतात कसोटी सामन्यात विजय मिळवण्याची ही चौथीच वेळ आहे.

भारतीय संघ गेल्या १२ वर्षात मायदेशात सलग १८ कसोटी मालिकेत पराभूत झालेला नव्हता. मात्र, न्यूझीलंडने भारताचा विजयीरथ रोखला आहे. त्यांनी तब्बल १२ वर्षांनी आणि १८ कसोटी मालिकांनंतर भारतीय संघाला त्यांच्याच मायदेशात कसोटी मालिकेत पराभूत केले आहे. भारतीय संघ मायदेशात अखेरचा २०१२ साली इंग्लंडविरुद्ध कसोटी मालिकेत पराभूत झाला होता. न्यूझीलंडने भारताविरुद्ध दुसऱ्या कसोटीत तिसऱ्याच दिवशी ११३ धावांनी विजय मिळवला. यासह न्यूझीलंडने तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-० अशी विजयी आघाडीही घेतली आहे. यामुळे आता न्यूझीलंडने मालिकाही खिशात घातली आहे. न्यूझीलंडच्या या विजयात मिचेल सँटेनरने १३ बळी घेत मोलाचा वाटा उचलला आहे.

लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा डाव ६०.२ षटकात २४५ धावांवर संपुष्टात आला. यादरम्यान, भारतीय संघाकडून सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि रोहित शर्मा यांनी चांगली सुरुवात केली होती. मात्र, ६ व्या षटकात कर्णधार रोहित ८ धावा करून मिचेल सँटेनरच्या गोलंदाजीवर बाद झाला. यानंतर शुभमन गिल आणि यशस्वी जैस्वाल यांनी डाव सावरण्याबरोबरच धावफलक हलता राहिल याची काळजी घेतली. त्यांनी त्यांची अर्धशतकी भागीदारीने न्यूझीलंडला दबावात टाकले होते. लंच ब्रेकनंतर १६ व्या षटकात सँटेनरने शुभमन गिलला गिल २३ धावांवर बाद केले. त्याची जैस्वालसोबतची ६२ धावांची भागीदारीही तुटली. यानंतरही जैस्वाल आणि विराट कोहली यांनी डाव पुढे नेण्याचा प्रयत्न केला होता. जैस्वालने अर्धशतकही पूर्ण केलेलं होतं. पण जैस्वाललाही ७७ धावांवर सँटेनरने झेल बाद करत भारताला मोठा धक्का दिला.

यानंतर मात्र भारताची फलंदाजी आणखी गडगडली. मात्र, रविंद्र जडेजाने भारताला जिंकण्यासाठी जिद्द दाखवली खरी, परंतु जडेजा ६१व्या षटकात ४२ धावांवर बाद झाल्याने भारताचा डाव संपला. या डावात न्यूझीलंडकडून मिचेल सँटेनरने सर्वाधिक ६ बळी घेतले. तर, अजाज पटेलने २ बळी आणि ग्लेन फिलिप्सने १ बळी घेतला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)